डॉ० बाबा आढाव

# गेल्या २५ वर्षांतील महाराष्ट्राचे समाजकारण

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात विषमता तीव्र आहे आणि तिचे निर्मूलन करणे हे एक प्रचंड मोठे आव्हान आहे. या विषमतेवर हल्ला करणाऱ्या समाज क्रांतिकारकांची आणि समाज-सुधारकांची नावे वेळोवेळी घेतली जातात, त्यांचे पुतळे उभे केले जातात, परंतु इतिहासात रमणारा मराठी माणूस वर्तमानकालातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीच्या बाबत मात्र बघ्याची भूमिका घेतो. गेल्या पंचवीस वर्षांतील महाराष्ट्राच्या समाजकारणातील विविध चळवळींचा आढावा घेताना डॉ० आढाव यांनी त्या चळवळींचे जसे मूल्यमापन केले आहे, त्याचप्रमाणे ज्या चळवळी विषमतेचे निर्मूलन करण्यासाठी निर्माण झाल्या त्यांच्याबाबत महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता तटस्थच राहिली हेही त्यांनी दाखवून दिले आहे. आपल्या समाजाच्या भविष्यकालीन स्वरूपाबाबत मराठी जनता उदासीन आहे असाच डॉ० आढावांचा निष्कर्ष आहे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातून झाली ही बाब निर्विवाद आहे. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलनाचे स्वरूप सांस्कृतिक होते. संयुक्त महाराष्ट्र कशासाठी ? या प्रश्नाचे उत्तर १९३८ सालापासून अनेकप्रकारे निरनिराळ्या शब्दांत दिले असल्याचे लक्षात येते. मराठी भाषा व संस्कृती या दोन्ही बाबी मात्र प्रत्येक उत्तरात कायम आहेत. "सार्‍या मराठी भाषिकांना एकत्र आणण्यासाठी", "भाषिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उन्नती होण्यासाठी", "लोकशाही राज्यघटना यशस्वी करण्यासाठी", "समाजवादी महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी", "महाराष्ट्रातून दारिद्र्य आणि असमानता दूर करण्यासाठी" असे कितीतरी शब्दप्रयोग वेळोवेळी वापरण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीर अमर शेख यांच्यासारख्यांची शाहिरी पणाला लागली. कॉ० सुधीर फडके यांच्या गीतांचे बोल त्यांनी मंत्राप्रमाणे उच्चारले.

"जनतेच्या शक्तीची ज्योत जागती।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥"

देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनातील एस० एम० जोशींच्या सारख्या राष्ट्रीय नेत्यांनी या आंदोलनाची धुरा खांद्यावर घेतलेली होती. दादासाहेब गायकवाड, कॉ० डांगे, नानासाहेब गोरे इत्यादी मंडळी राष्ट्रीय पक्षांचे नेते होते. त्यामुळे भाषिक राज्याची मागणी करीत असतानाही राष्ट्रीय भान सुटले नाही, हे जरी खरे असले तरी मराठी माणसाची अस्मिता नेमकी ओळखून या जनशक्तीच्या अचाट पराक्रमयुगाचे रूपांतर लोकशाही व समतेच्या दिशेने वाटचाल करण्यात म्हणावे तसे यशस्वी झाले नाही. प्रत्यक्ष आंदोलनात बहुसंख्य मराठी भाषिकांनी मिळून उद्योगपतीपासून हमालापर्यंत व खेड्यात वेशीतील व वेशीबाहेरच्या सर्व घटकांनी भाग घेतला होता. या झंझावातामुळे सर्व महाराष्ट्र गदगदा हलला. चळवळीच्या काळात महाराष्ट्राची सांस्कृतिक व नैतिक पातळी काहीशी उंचावली गेली. जनता पुढे व पुढारी मागे अशी अवस्था काही वेळेस निर्माण झाली. महाराष्ट्राला या आंदोलनाने झपाटले होते. जात-पात, कुळी, मालक-कामगार इत्यादी भेदांच्या पलीकडे मराठी माणूस गेला होता. त्याचे एकच उदाहरण द्यावयाचे झाल्यास १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वसाधारण जागेवर अनेक दलित उमेदवार लोकसभा व विधानसभेत सहजी निवडून आले. मुंबईचे महापौर, पुण्याचे उपमहापौर, कल्याण, मनमाड, नासिक रोड इत्यादी नगरपरिषदांच्या अध्यक्षपदी दलित मंडळी निवडून आली. मराठी माणसांची एकजूट विलक्षण होती. सभा, मोर्चे, निदर्शने, सत्याग्रह या सर्व कार्यक्रमांत वय विसरून वृद्ध-तरुण सामील झाले होते. १८ एप्रिल १९५८ रोजी मुंबईत महर्षी अण्णासाहेब कर्वे यांची शताब्दी साजरी झाली. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू या समारंभाचे अध्यक्ष होते. अण्णासाहेबांनी या सत्कारसभेत आपल्या कातर आवाजात नेहरूंना सांगितले, "जीवनातील माझ्या सर्व आकांक्षा पूर्ण झाल्या आहेत. आता नजिकच्या भविष्यकाळात

महाराष्ट्र व गुजराथ ही दोन राज्ये अस्तित्वात आलेली " याची देहि याची डोळा " दिसली म्हणजे माझी कोणतीच इच्छा उरणार नाही. " सेनापती बापट तर म्हणायचे– " महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले. "

मराठी माणसाच्या अस्मितेचा अर्थ प्रत्येकजण सोयीप्रमाणे लावत होता. लोकांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. मात्र प्रत्येक स्तराच्या अपेक्षा वेगवेगळ्या होत्या. एक धागा मात्र बळकट होता. " संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे " यामध्ये " च "ची भाषा कशाला असे यशवंतराव चव्हाण विचारीत. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यशस्वी झाले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. " संयुक्त " हा शब्द गळून पडला. आंदोलन यशस्वी झाले असले तरी महाराष्ट्राची राजकीय सत्ता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या हाती आली नाही. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याच हाती नव्या राज्याची सूत्रे गेली. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर यशवंतराव स्वार झाले. प्रतापगडावर पंडित नेहरूंच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे त्यांनी अनावरण केले. आणि पुढे मुंबईत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने उभारण्यात आलेल्या १०५ हुतात्म्यांच्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी ते मुख्यमंत्री या नात्याने जातीने हजर राहिले. एका लेखकाने लिहिले आहे– " श्री छत्रपती शिवाजी महाराजांना सुद्धा मिळवता आले नाही एवढे मोठे विदर्भासकटचे राज्य त्यांचे हाती आले. " यशवंतरावांचा उल्लेख काही जणांनी " प्रति शिवाजी " म्हणून केला.

मराठी भाषिकांचे भाषिक राज्य स्थापन करावे लागणार हे ओळखून यशवंतरावांनी पावले उचलली व आपले डावपेच आखले. महाराष्ट्रात राज्य कोणाचे, जोशी–डांग्यांचे ? की चव्हाण–देसाईंचे ? असा प्रश्न कर्णोपकर्णी विचारला जाऊ लागला आणि समितीच्या नेत्यांना बचावात्मक पवित्रा घेऊन त्याचे उत्तर द्यावे लागले. संयुक्त महाराष्ट्र समिती निर्माण झाली त्याबरोबर उद्दिष्ट व कार्यक्रमही ठरवण्यात आला, परंतु समितीला राजकीय पक्षाचे स्वरूप येऊ शकले नाही अन् ते असंभवनीय होते. त्याचे कारण समितीतील घटक पक्षांना अखिल भारतीय पक्षांचे नाते तोडून राज्यपातळीवर वेगळा पक्ष स्थापणे ही बाब अशक्यप्राय होती. त्यामुळेच भाषिक राज्याच्या निर्मितीपुरतेच समितीचे उद्दिष्ट मर्यादित झाले.

" बहुजन कल्ट " हा शब्दप्रयोग राजकीय सत्तेच्या संदर्भात उच्चारला जाऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या घटिताबद्दल पूर्वीच इशारा दिला होता. त्यांनी १९४८ साली भाषावार प्रांत कमिशनपुढे जे निवेदन सादर केले, त्यात " उभ्या हिंदुस्तान देशातील समाज, जातीय पद्धतीने संघटित झालेला आहे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी अशा देशाची विभागणी कोणत्याही प्रकारे केली तरी, प्रत्येक प्रांतात एक जात, संख्याबळामुळे दुसऱ्यावर सततच वरचढ राहील, त्या विभागातील सर्व राजकीय सत्तेचा एकमेव वारसा वरचढ जातीकडे राहील. मुंबईचा समावेश महाराष्ट्रात केला तर महाराष्ट्रीय गुजराथींहून वरचढ होतील असे म्हणतात परंतु ही गोष्ट फक्त महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहणार आहे काय ? मराठी बोलणाऱ्या लोकांमध्ये देखील असा प्रकार घडून येणार नाही काय ? मराठी भाषा बोलणाऱ्यांमध्ये दोन तीन भाग आहेत. मराठा आणि बिगर मराठा हे ते दोन भाग होत. माझी पुरी खात्री आहे की, मराठा लोक वरचढ होऊन गुजराथी भाषा बोलणारांना अगर बिगर मराठी बोलणारांना अंकित ठेवतील याचप्रकारे गुजराथमधील काही भागात अनविल ब्राह्मणवर्ग शिरजोर बनेल. बाकीच्या भागात पाटीदार वर्ग वर्चस्व ठेवील. ब्राह्मणवर्ग व पाटीदार वर्ग मिळून इतर जातींना दडपून ठेवतील हे अगदी संभवनीय आहे तेव्हा हा प्रश्न महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही. सर्वांना लागू होणारा हा सर्वसाधारण प्रश्न आहे. " काळाच्या ओघात संयुक्त महाराष्ट्र समिती अस्तंगत झाली, समितीतील घटक पक्ष वेगवेगळे झाले. समितीचे अनेक आमदार काँग्रेसमध्ये शिरले. आयाराम–गयारामच्या नीतीची सुरवात झाली. वेरीज–वजाबाकीच्या राजकारणात यशवंतरावांचा हातखंडा होता. महाराष्ट्र राज्याचे स्वप्न साकार झाले पण महाराष्ट्राच्या समाज जीवनात रंग भरण्याचे काम अधुरे राहिले. यशवंतराव चव्हाणांचा मार्ग निर्वेध व मोकळा झाला. परंतु त्यांना महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील भंगलेल्या मनाची जाणीव होती. जातीयवादाचे विष किती भयंकर आहे याची चर्चा त्यांनी त्याचवेळी उपस्थित केली. नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत श्री० गजानन माडखोलकर यांनी " महाराष्ट्राच्या निमित्ताने निर्माण होणारे राज्य हे मराठा राज्य आहे की मराठी राज्य आहे ? " असा प्रश्न उपस्थित केला. यशवंतरावांनी हे मराठा राज्य मुळीच होणार नाही, एका जातीचे, मराठ्यांचे होऊ देणार नाही. अशी ग्वाही दिली होती. आता २५ वर्षांनंतर जो अनुभव येतो आहे त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. घोषणा, आश्वासने, जाहीर प्रतिज्ञा ह्या मोघमच राहिल्या.

१९५६ साली डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षा घेतली. महाराष्ट्रात नवबौद्धांचा नवा वर्ग निर्माण झाला. यशवंतरावांनी या समस्येचा उल्लेख करून वेध घेतलेला आहे. ब्राह्मणेतर चळवळींचा वारसा त्यांनी जाणीवपूर्वक नाकारला होता. समाजवादाला त्यांची मान्यता असली तरी त्याबद्दल ते आग्रही नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीतही त्यांचे क्रांतिवीर नाना पाटलांच्या बरोबर जमले नाही. चव्हाणांची प्रकृती नेमस्त होती. महाराष्ट्रातील ब्राह्मण, पांढरपेशा वर्ग व नवबौद्ध या प्रभावी जातींच्या बरोबर त्यांनी जमवून घेतले. आर्थिक हितसंबंधांच्याबाबतीत क्रांतिकारक बदल करण्याकडे त्यांचा कल नव्हता आणि काँग्रेस पक्षाबाहेरही म्हणावा असा रेटा नव्हता. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्याबरोबर त्यांनी गांधीवधानंतर महाराष्ट्रातील ब्राह्मण वर्गाला दिलेले कर्ज साहाय्य माफ केले. पुढे काही वर्षांनी मराठा–महारांनी कोठवर व किती दिवस भांडायचे ? असा प्रश्न उपस्थित करून रिपब्लिकन पक्षाबरोबर राजकीय सोयरीक जमवली.

१९६२ सालच्या निवडणुका चव्हाणांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेस पक्षाने सहजी जिंकल्या. चिनी आक्रमणानंतर १९६३ साली यशवंतराव चव्हाण यांची देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर नियुक्ती झाली. " महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला " या शब्दात वर्णने छापून आली आणि यशवंतरावांच्या नेतृत्वाला नवी झळाळी प्राप्त झाली. एक नवे राष्ट्रीय परिमाण प्राप्त झाले. दिल्लीला जाताना यशवंतरावांनी मुख्यमंत्री पदाची सूत्रे दादासाहेब कन्नमवारांच्या हाती दिली. मराठी भाषिक राज्य स्थापन झाले असले तरी प्रादेशिक ऐक्याचा प्रश्न उरलेला होता. विदर्भाशी मानसिक सांधेजोड होणे आवश्यक होते. श्री० कन्नमवारांच्या निधनानंतर वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. श्री० नाईक हे लमाण बंजारा समाजातले असले तरी त्यांचे घराणे श्रीमंत, मालगुजार बागाईतदार होते

दाक्षांचे प्रगतिशील बागाईतदार म्हणून त्यांचा लौकिक होता. नाईकांचा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीशी व महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीशी कितपत संबंध होता हे सांगणे कठीण आहे. सरंजामी वातावरणात ते वाढलेले होते. त्यामुळे समाजवादी जडणघडणीशी त्यांना आस्था नव्हती. वसंतराव नाईकांच्या काळात मुंबईत शिवसेनेचा जन्म झाला. शिवसेना म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची स्वाभाविक विकृतीच होय, असे मधु लिमये म्हणाले होते. नाईकांनी या घटिताचा खुबीनं वापर करून घेतला आणि मुंबई शहरातील पुरोगामी व डाव्या चळवळींच्या वाढीला पायबंद घातला मुंबई शहरातले वातावरण काही काळ गढूळ झाले. मराठी माणसाची एक विकृत प्रतिमा देशाच्या पातळीवर उमटली. काही महिन्यापूर्वी यशवंतराव चव्हाणांचे निधन झाले. त्याअगोदर काही दिवस पुण्यात झालेल्या एका जाहीर सभेत नाईकांच्या बाबतीत आपला भ्रमनिरास झाल्याचे त्यांनी बोलून दाखविले. संरक्षणमंत्रीपदावर नियुक्त झाल्यानंतर चव्हाणांना नासिक, जिल्ह्यातून लोकसभेवर बिनविरोध निवडून पाठविण्यात आले. आणि त्याचवेळी रिपब्लिकन पक्षाच्या दादासाहेबांनाही निवडून देण्यात आले. कॉंग्रेस रिपब्लिकन युतीची नांदी झाली. या युतीमुळे आर्थिक, सामाजिक हितसंबंध बदलून मिळणे अवघड होते. तरीही रिपब्लिकन पक्षातील काही मंडळी कॉंग्रेसमध्ये शिरली परंतु लवकरच त्यांचा अपेक्षाभंग झाला.

१९६५ साली सर्व देशभर रिपब्लिकन पक्षाने सरकारी जमिनीवर सत्याग्रह केले. तीन लाख सत्याग्रही तुरुंगात गेले. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी काही किरकोळ मागण्यांबाबत तडजोड केली, यामागे यशवंतराव चव्हाणांचे दिल्लीतील वास्तव्यही कारणीभूत होते. महाराष्ट्र राज्यात कॉंग्रेस पक्षाची पकड बळकट झाली असली तरी चिनी आक्रमणानंतर दिल्लीतील परिस्थिती झपाट्याने पालटू लागली. डॉ० राम मनोहर लोहिया, आचार्य जे० बी० कृपलानी, मिनू मसानी, यांच्यासारखी मातब्बर मंडळी लोकसभेच्या पोटनिवडणुकीत निवडून आली. डॉ० राम मनोहर लोहियांनी गैर-कॉंग्रेस वादाची मांडणी करावयास सुरवात केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांचे काळात महाराष्ट्रात धरण व प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाने उचल खाल्ली. धरणाच्या खाली ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी, संसार, प्रपंच बुडतात त्या शेतकऱ्यांनी जागोजाग मोर्चे, धरणे, परिषदा, सत्याग्रह इत्यादी आंदोलने सुरू केली. १९६५–६६ मध्ये मुंबईत डाव्यांना मोर्चा काढणे अवघड झाले होते पण याच काळात महाराष्ट्रातल्या धरणग्रस्तांनी मुंबईमध्ये दादरपासून सचिवालयापर्यंत मोठा मोर्चा काढला. धरण व प्रकल्पग्रस्तांना जमिनी मिळत नव्हत्या. परंतु कमांड एरियात नव्याने पाणी येणार, त्यामुळे जिरायती शेतीचे रूपांतर बागायतीमध्ये होणार, सीलिंग बदलणार आणि कदाचित वरकड जमीन सरकारजमा होणार या शंकेने कमांड एरियातील शेतऱ्यांनी खातेफोड केली. जादा जमिनी विकून टाकल्या. अशा जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांना ऊत आला. संपत्ती कर चुकविण्यासाठी पुण्या-मुंबईच्या धन दांडग्यांनी शेतजमिनी खरेदी करण्याचा सपाटा लावला. राजकपूर सारखे नट या व्यवहारात उतरले. स्वतः मुख्यमंत्री वसंत नाईक यांनी पुणे जिल्ह्यात यवतला वत्सलाबाई नाईकांच्या नावे तर यशवंतराव चव्हाणांनी उरळी कांचनला वेणूताई चव्हाणांचे नावावर जमीन खरेदी केली. पुढे काही दिवसांनी धरण व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी या जमिनीवर सत्याग्रह केले व असे अनेक खरेदी व्यवहार उजेडात आणले. धरणासाठी सर्वस्व बुडवणाऱ्याला जमीन मिळत नाही... मात्र मंत्रीगण जमिनी मिळवतात ही विसंगती स्पष्ट झाली. धरण व प्रकल्पग्रस्तांच्या नंतर समाजवादी पक्ष व इतरांनी जमीन बळकाव आंदोलन सुरू केले.

पुण्या-मुंबईसारख्या औद्योगिक शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांनीही चळवळीचे निशाण रोवले. वसंतराव नाईकांच्या काळात राजकीय स्थैर्य तसे मजबूत होते. पानशेतचा प्रलय, कोयनेचा भूकंप आणि महाराष्ट्रातील भीषण दुष्काळ यातून महाराष्ट्र कॉंग्रेस तरून गेली. १९६५ ते ७० या काळात सामाजिक स्तरावर अनेक आंदोलने चालू होती. हमीद दलवाईंनी १९७० सालीच मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना केली. धर्म व शासन यांच्या संबंधांचा प्रश्न उपस्थित करून पंढरपूरच्या विठ्ठलाची शासकीय पूजा बंद पाडण्यात महाराष्ट्रातील विचारवंतांना यश आले. वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारे शंकराचार्य व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री० गोळवलकर गुरुजी यांचे विरुद्ध जागोजाग निदर्शने झाली. असुरक्षित कामगारांच्या क्षेत्रात अंगमेहनत करणाऱ्या हमालांच्यासाठी महाराष्ट्र शासनाला माथाडी हमाल असुरक्षित कामगार कायदा मंजूर करावा लागला. १९६९ साली एक खळबळजनक घटना घडली. पुणे जिल्ह्यातील कुकडीच्या धरणग्रस्तांनी भारताचे तत्कालीन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व्हावयाचा भूमिपूजन व पायाभरणी समारंभ उधळून दिला. या घटनेचे प्रतिसाद संपूर्ण देशभर उमटले. विकसनशील पुनर्वसनाच्या मागणीने नेट धरला. " ज्याचे पोट दुखते तो ओवा मागणारच " या शब्दात यशवंतरावांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

१९७२ साली महाराष्ट्राला भीषण दुष्काळाला तोंड द्यावे लागले. याच काळात म० जोतीराव फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने ' एक गाव एक पाणवठा ' मोहीम सुरू झाली. म० फुल्यांनी स्व-घरचा आड १००–१२५ वर्षांपूर्वीच खुला केला होता. मोहिमेमुळे खेड्यपाड्यांतून होणारे दलितांचे हाल चव्हाट्यावर आले. या काळातच मुंबईत दलित पँथर या लढाऊ संघटनेची स्थापना झाली. शिवसेना व दलित पँथर यांच्यातील संघर्ष तीव्र बनले. वरळीच्या बी० डी० डी० चाळीत सवर्ण विरुद्ध दलित अशी दंगल उसळली. पँथरच्या निर्मितीबरोबरच महाराष्ट्रातील अनेक दलित अत्याचाराची प्रकरणे उघडकीला आली. परभणी जिल्ह्यातील ब्राह्मणगावच्या दलित महिलेची नालस्ती, अकोला जिल्ह्यातील पांगरीकुट्याचे पाणवटा प्रकरण, धाकलीच्या गवई बंधूंचे काढलेले डोळे, तर जालन्याच्या उत्तम गोसावीची तोडलेली जीभ व हात, इंदापूर बावड्याचा बहिष्कार अशी शेकडो प्रकरणे घसास लागली.

१९७३ साली सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला १०० वर्षे झाली. तर १९७४ साली राजर्षी शाहू जन्मशताब्दी व कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची जन्मशताब्दी साजरी झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी एक गाव एक पाणवठा हा शासकीय कार्यक्रम म्हणून परस्पर जाहीर केला. मात्र एकही पाणवठा खुला करायला नाईक गेले नाहीत. तत्कालीन शिक्षणमंत्री शरद पवार काही ठिकाणी गेले. त्यांना जोरदार विरोध झाला. वसंतराव नाईकांना पुढे काही दिवसांनी मुख्यमंत्री पद सोडावे लागले. व त्यांचे जागी शंकरराव चव्हाणांची नियुक्ती झाली. कार्यक्षमतेबद्दल शंकरराव चव्हाणांचा लौकिक असला तरी त्यांची विचारसरणी पुरोगामी होती असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत होरपळत असताना अन्नधान्याची नासाडी करून पंढरपुरात विश्वशांती यज्ञ करणाऱ्या तनपुरे

महाराजांचेच या भल्या माणसाने पाय धरले. यज्ञाला मिळणारे धनधान्य वाहून नेण्यासाठी जकात माफी जाहीर झाली. तनपुरे महाराजांच्या विश्वशांती यज्ञातील अन्न-धान्य नासाडीला बंदी घालावी यासाठी पंढरपुरात सत्याग्रह, आंदोलने झाली. शंकरराव चव्हाणांनी पंढरपूरच्या विठ्ठलाची शासकीय पूजा परत सुरू केली. शंकरराव चव्हाण हे हैदराबादच्या मुक्तिसंग्रामात भाग घेतलेले नेते असले तरी त्यांचा वैचारिक पिंड फारसा खुला नव्हता. त्यांच्याच काळात कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लजला सप्टेंबर ७५ मध्ये म्हणजे आणीबाणीच्या काळात देवदासी पुनर्वसन परिषद भरली. यल्लाम्मा देवीच्या नावाने हजारो मुलींची देवाबरोबर लग्ने लावली जातात. अशा मुलींना कोणाशीही लग्न करता येत नाहीत. झुलवा लावून घेता येतो. या भयावह प्रथेमुळे वेश्या व्यवसायाला उत्तेजन मिळते. गडहिंग्लज परिषदेत देव-दासींनीच आपली गाऱ्हाणी वेशीवर टांगली. आणीबाणीमध्येच विचार स्वातंत्र्याबरोबरच सप्तस्वातंत्र्याचा बोलबाला झाला. एक गाव एक पाणवठा मोहीम, देवदासी प्रथा, यांमुळे एक नवा संदर्भ आणीबाणीच्या लढ्याला प्राप्त झाला. याच काळात पुणे शहरातल्या २०-२५ हजार झोपडवासियांनी एक प्रचंड परिषद घेऊन २४ तासांत विनासूचना झोपडी पाडण्याच्या राज्यपालांनी काढलेल्या वटहुकुमाविरोधी आवाज उठविला. आणीबाणीत अशी परिषद भरवणे सोपे नव्हते. या परिषदेत महाराष्ट्रातील एका विद्वानाने या निमित्ताने का होईना शासनाचे झोपडपट्टीवासियांकडे लक्ष गेले म्हणून शासनाचे अभिनंदन करावे म्हणून सूचना आणली. सभेने या सूचनेचा धिक्कार केला.

जून १९७५ ते जानेवारी ७७ या आणीबाणीच्या काळात देशभर वेगळ्याच प्रकारचे विचारमंथन झाले. २० मार्च १९७७ रोजी डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्यावर केलेल्या सत्याग्रहाला ५० वर्षे पूर्ण झाली आणि याच दिवशी देशातील लोकसभेच्या निवडणुकांचे निकाल धडाधड बाहेर आले. दिल्लीतील राजवट बदलली आणि पाठोपाठ राज्यातील सरकारेही बदलली. १९७७ च्या जानेवारी महिन्यात प्रा० गं० बा० सरदार, प्रा० अ० भि० शहा इत्यादींच्या पुढाकाराने विषमता निर्मूलन समितीची स्थापना करण्यात आली. समितीने तपशीलवार कार्यक्रम जाहीर केले. संसद्बाह्य क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व संघटनांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रात १९७८ साली सत्तांतर घडले. त्यावेळी १९७७ साली मुख्यमंत्री पदावर वसंतदादा पाटलांची नियुक्ती झाली. चवदार तळ्याच्या समारंभास वसंतदादा उपस्थित होते आणि त्याच ठिकाणी दादांना काही रिपब्लिकन व दलित नेत्यांनी मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेब आंबेड करांचे नाव देण्याची मागणी केली. दादांनी त्यावेळी होकार दिला होता व रीतसर मागणी करण्याची सूचना केली होती. पुढे मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारणीत तशा अर्थाचा प्रस्ताव मंजूर झाला. १९७८ च्या मे-जून महिन्यात त्यांच्या अमदानीतील एका मंत्रिमंडळाच्या बैठकीत नामांतराचा ठरावही मंजूर केल्याचे समजते. वसंतदादांच्या काळातच देवाचे आळंदीत सत्याग्रह जून १९७८ मध्ये झाला. ज्ञानेश्वरांच्या पालखी यात्रेतील अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून फार मोठे आंदोलन झाले. त्यावेळच्या महाराष्ट्र शासनाला लवकर निर्णय करता येईना. अस्पृश्यता गुन्हा कायदा अस्तित्वात असतानाही अस्पृश्यतेची वहिवाट शासनाला बंद पाडता येईना. सामाजिक प्रथांच्या बाबतीत शासनकर्ते किती नेभळट भूमिका घेऊ शकतात याचे ते प्रत्यंतर होते.

जुलै महिन्यात दादांचे सरकार गडगडले आणि महाराष्ट्रात शरद पवारांची राजवट सुरू झाली. २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधान-सभा व परिषदेत मराठवाडा विद्यापीठाच्या नामान्तराचा प्रस्ताव एकमताने मान्य झाला. मराठवाडा विद्यापीठाऐवजी डॉ० बाबासाहेब आंबेडकर मराठ-वाडा विद्यापीठ हे नाव मान्य झाले. सामाजिक समतेच्या लढ्याची अनेकांना ही घटना नवी नांदी वाटली शरद पवारांकडे लोक उमेदीने पाहात होते. मराठवाडा विद्यापीठाचा नामान्तराचा ठराव विधानसभेत मान्य झाला. आणि त्याचबरोबर मराठवाड्यात दंगली उसळल्या. शासनाने ठरावाचे अंमलबजावणीबाबत मुग्धता स्वीकारली. मराठवाड्यातील दंगलीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. वैधानिक पातळीवर एकमताने मान्य झालेल्या प्रस्तावांची गुंडगिरीने वासलात लावता येते असे चित्र निर्माण झाले. आणि यामुळेच १९७९ सालच्या डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रात नामान्तर आंदोलन उभे राहिले. लॉंग मार्चची सुरवात झाली. या सत्याग्रहात हजारो सत्याग्रही तुरुंगात गेले. दलित दलितेतर एकजुटीचे अभूतपूर्व दृश्य पाहण्यास मिळाले. महाराष्ट्राच्या सर्व पुरोगामी संघटना या आंदोलनात उतरल्या.

मध्यंतरीच्या काळात शहादे विभागातील आदिवासींच्या चळवळीने आदिवासींच्या हलाखीकडे लक्ष वेधले. श्रमिक संघटनेचा लढा चिरडून टाकण्यासाठी पुरुषोत्तम सेनेसारखी खाजगी सशस्त्र दले निर्माण झाली. शासनाला आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी खरेदी व्यवहारास बंदी


नु – स्पार्टिन

सूक्ष्म पोषक द्रव्ययुक्त पिकांवर फवारण्याचे खत

( सर्व पिकांना उपयुक्त )

नत्र, पालाश, स्फुरद विरहित

– स्पार्टिन –

सूक्ष्म घटकद्रव्य युक्त भू-संजीवनी

–: उत्पादक व विक्रेते :–

स्वाती इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड

रजि० ऑफिस :
'जमुनोत्री' २६ वारस्ता,
बांद्रा, मुंबई ४००.५०

सेल्स ऑफिस :
मोरे हाऊस, २२६ स्वामी
विवेकानंद रोड,
मुंबई – ४०००५०

तार : नोफॅमिन

फोन : ६४२८४८१ – ६४२८४८२

फक्टरी :
१८८, लेकरोड, भांडुप, मुंबई ४०००७८
फोन : ५६१२१२८, ५६१०९१६

घालणारा कायदा मान्य करावा लागला. वेठबिगारीची व ग्रामीण सावकारशाहीची अनेक प्रकरणे वेशीवर टांगण्यात आली. जैन समाजातील तरुण मुलींचा दीक्षा विधी, मुस्लिम समाजातील तलाक, दाऊदी बोहरा समाजातील मिसाक व बारात प्रथा महानुभव पंथातील देवाच्या बरोबरची लग्ने, ग्रामीण भागातील बुवाबाजी व अंधश्रद्धा याविरुद्ध जागोजाग निदर्शने झाली. अंधश्रद्धा निर्मूलनाचे अभियानच सुरू झाले. डॉ० कोवूर यांचे शिष्य बी० प्रेमानंद यांची महाराष्ट्र फेरी संघटित करण्यात आली. व त्यातूनच पुढे लोकविज्ञानाच्या चळवळीने आकार घेतला. १९८० साली देशात पुनश्च सत्तान्तर घडले.

१९८२ साली मराठवाडा विद्यापीठाचा नामान्तराचा लढा तीव्र करण्यात आला. परंतु विधानसभेत आणि विधानपरिषदेत नामान्तराच्या अंमलबजावणीचा प्रस्ताव पाशवी बहुमताने फेटाळण्यात आला. या घटितास महाराष्ट्राच्या विरोधी पक्षाचाही हातभार लागला. काहींनी जाणीवपूर्वक गैरहजेरी ठेवली तर काही तटस्थ राहिले. दलित चळवळीला एक दारुण अनुभव घ्यावा लागला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामान्तर लढ्याने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. त्यावेळचे मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी नामान्तर आंदोलनाची प्रच्छन्न शब्दात हेटाळणी केली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी " भंगलेले मन " सांधायला निघालेले यशवंतराव चव्हाणांच्यासारखे नेते यावेळी मूग गिळून गप्प बसले. वास्तविक यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार या तिघांनी " मराठवाड्याचा महारवाडा " करावयाचा आहे काय? या प्रश्नाला मराठवाड्यात हिंडून उत्तर द्यायला हवे होते. मुख्यमंत्रीपदावर आरूढ झालेले शरद पवार दंगलीनंतर तब्बल दीड महिन्यांनी मराठवाड्यात गेले. सामाजिक प्रश्नांची उपेक्षा करण्यात काही सवर्ण मंडळी धन्यता मानतात. हिंदू एकता, मराठा महासंघासारख्या संघटनांना छुपा पाठिंबा देतात. सबंध राजकारणच मुळी संधिसाधूपणाचे व व्यक्तिकेंद्रित बनलेले आहे. सत्तेच्या क्षेत्रात उलथापालथी होतात. परंतु तळागाळातल्या मंडळींचे जीवनप्रश्न उपेक्षित राहतात. सत्तेचं राजकारण म्हणजे लब्धप्रतिष्ठांचा खेळ बनतो. गावच्या पाणवठ्यापाशी सत्ता लुळी पडते. कायद्याने प्रतिबंध असूनही एकाही देवदासीला वाचवता येत नाही. आणि बहुसंख्य कष्टकरी वर्ग, हातावर पोट भरणारा कामगार कामगार कायद्यापासून वंचित राहतो. हे चित्र उबग आणणारे आहे.

१९८२ सालच्या अगोदरपासून महाराष्ट्राच्या भटक्या विमुक्तांनी आपली गाऱ्हाणी बुलंद केली. २६ जानेवारी १९८२ रोजी औरंगाबादला भटक्या विमुक्तांनी प्रचंड मोर्चा काढला. " स्वातंत्र्याचे झाले काय? आमच्या हाती आले नाय " ही घोषणा बुलंद केली. १९८३ सालात भटक्या विमुक्तांच्या राज्य पातळीवरील संघटनेने आकार घेतला. दलित चळवळीत भटके विमुक्तांनी एक नवा संदर्भ निर्माण केला.

१९८२–८३ सालापासून मंडल आयोगाने केलेल्या शिफारशींचा प्रश्न रस्त्यावर आला. देशातील ३७४२ इतर मागास जातींच्या ५२ टक्के लोकसंख्येसाठी मंडल आयोगाने सरकारी नोकऱ्यात व शिक्षण क्षेत्रात २७½ टक्के आरक्षणाची शिफारस केली. १९८१ साली गुजराथ राज्यात राखीव जागा हटवा आणि देश वाचवा हे आंदोलन सुरू झालं होतं. महाराष्ट्रात मराठा महासंघाने या मागणीला पाठिंबा दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पतित पावन, हिंदू एकता इत्यादी संघटनांनी तोच सूर लावला. याचबरोबर हिंदू–मुस्लिम दंगलीचे प्रकार वाढीला लागले.

मंडल आयोगाच्या शिफारशींमुळे दलित आणि आदिवासींच्या विरोधी आंदोलनात इतर मागासवर्गीयांची सहानुभूती दलित आदिवासींच्या बाजूला वळली तर न्यायमूर्ती जस्टीस वेग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अल्पसंख्य आयोगाने इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवण्याविरुद्ध मत प्रदर्शित केले. नुकत्याच सुरू झालेल्या गुजराथ, मध्यप्रदेशातील आंदोलनामुळे राखीव जागांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

आर्थिक विषमता पराकोटीला गेलेली आहे. गरिबीच्या पातळीखाली जगणारांची संख्या ७० टक्के झाली आहे. मात्र या देशातील संसदीय राजकारणाचा आधार " जात " हाच राहिला आहे. अशा परिस्थितीत " पुरोगामी परिवर्तनवादी मोर्चाची बांधणी करणं " ही अवघड बाब बनलेली आहे. राजकीय पातळीवर फाटाफुटीचं चित्र उमटताना दिसत आहे, तर प्रतिगामी संघटनांच्या संख्येतही वाढ होत आहे. पतितपावन, हिंदू एकता शिवसेना, जमाते इस्लामी, तबलीग समाज अशी कितीतरी नावे या संदर्भात घेता येतील. अ० भा० ब्राह्मण महासंघाची जिल्हावार अधिवेशने भरत आहेत. दलित, पांढरपेशा वर्गात बामसेफ व बहुजन पक्षाने आपलं स्थान निर्माण केले आहे. दलित, मुस्लिम, अल्पसंख्याक सुरक्षा महासंघ स्थापन झाला आहे. राजकीय सामाजिक, आर्थिक इत्यादी पातळीवर एक चमत्कारिक असमतोल निर्माण झालेला आहे. राजस्तान, मध्यप्रदेशात सतीच्या चालीचं व बालविवाहांच्या चालीचं उदात्तीकरण होत असताना, महाराष्ट्रात हुंडाविरोध, स्त्री अत्याचार विरोध, स्त्री हक्कांची मांडणी, समान काम–समान दाम, मोलकरणींचे प्रश्न, देवदासी प्रथेचं निर्मूलन इत्यादी प्रश्नांवर स्त्री–मुक्ती यात्रा निघत आहेत. त्यातल्या त्यात हे शुभचिन्ह आहे. परंतु हे सारे एकाकी प्रयत्न आहेत. त्यांना जोडणारा धागा नाही.

" जात " हा शब्द उच्चारल्याबरोबर अनेक मंडळी नाक मुरडतात. जात व्यवहाराचे जुने ग्रामीण स्वरुप बदलत असले तरी तिला मिळणारे नवे स्वरूप फार क्लिष्ट आहे. सत्तेच्या राजकारणाचा आधार " जात " हाच तर आहे. जातीय पातळीवर स्तरीकरणाची मानसिकता आर्थिक पातळीवरही स्तरीकरणाला न कळत मान्यता देते त्यामुळे सर्वंकष विषमतेविरुद्धचा लढा उभार धरू शकत नाही.

मराठी भाषा आणि मराठी संस्कृती यांच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गेल्या २५ वर्षात मराठी भाषा राज्यकारभाराची भाषा होऊ शकली नाही याला काय करावे? मराठी साहित्याला देशाच्या पातळीवर मान्यता नाही. मराठी जीवनात चाललेल्या आंदोलनाचे मराठी साहित्यात प्रतिबिंब उमटत नाही. मात्र दलित साहित्याचा या बाबतीत अपवाद मानावा लागेल. मराठी संस्कृती असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा तिच्या प्रवाहात विषमतेचा प्रश्न आव्हानं देऊन उभा राहिला आहे. त्याचा मुकाबला करण्याची कुवत महाराष्ट्रामध्ये २५ वर्षांनंतरही निर्माण झालेली आहे असे म्हणता येणार नाही. शिवाजी महाराज, म. ज्योतीराव फुले, डॉ० बाबासाहेब आंबेडकर, लो० टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजर्षी शाहू छत्रपती, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी महापुरुषांची नावे इथे वेळोवेळी घेतली जातात. त्यांचे पुतळे उभे केले जातात. मराठी माणूस इतिहासात तात्काळ रमताना दिसतो, वर्तमानाबद्दल तो बघ्याची भूमिका स्वीकारतो; भविष्याबद्दल मात्र तो कमालीचा उदासीन आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील या पंचविशीला काय म्हणावे? ✳

## नरेंद्र दाभोलकर

# युवक चळवळ : स्वप्न आणि वास्तव

१९६० ते १९७० हा युवकांच्या अस्वस्थतेचा काळ होता. राजकीय पक्षांबाबत भ्रमनिरास झाल्यामुळे अस्वस्थ झालेले युवक, नक्षलवादी आणि हिप्पी या दोन टोकांमध्ये दोलायमान होते. या कालात युवकांनी अन्यायाच्या दाहक दर्शनाने क्षुब्ध होऊन अनेक उठाव केले.

१९७० ते १९८५ या कालातही युवक चळवळीने समाजजीवनातील अनेक उपेक्षित पण महत्त्वाचे प्रश्न पुढे आणले. परंतु राजकीय प्रक्रियेवर व प्रस्थापितांच्यावर या चळवळींचा फारसा परिणाम झाला नाही. आजच्या युवक चळवळीत अनेक परस्पर-विरोधी प्रवाह आहेत. काही विधायक कार्यक्रमांकडे युवक आकृष्ट होत आहेत. परंतु प्रस्थापितांना बिनतोड आणि बेदरकार टक्कर मारण्यापासून आज तरी युवक चळवळ बरीच दूर आहे.

१९६० ते ७० हा जगभरच युवकांच्या अस्वस्थतेचा काळ होता. या दशकात युवक म्हणून ज्या प्रेरणा प्रवाह, विचार रुजले त्यांचीच विविध रूपे पुढच्या पंधरा वर्षात युवक चळवळीतील परिवर्तनाच्या विविध प्रवाहांत विस्तारित झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या १९६० सालच्या स्थापनेनंतरचा पंचवीस वर्षांचा कालखंडही हाच आहे. या काळात चळवळ केलेली महाराष्ट्रातील मंडळी आता साधारण चाळिशीच्या अलीकडे पलीकडे पोचलेली असल्याने (आणि मीही त्यातील एक असल्याने) या प्रश्नाचा विचार करण्याचे अगत्य मला जाणवते.

आजची पिढी हिप्पी का नक्षलवादी ? हा १९६५ ते ७० च्या काळात परिसंवादाचा गाजलेला विषय होता. अनावर आवेग, बेदरकारपणा, मुळापासून बदलण्याची इच्छा, त्यासाठी झोकून देणे या तरुणाच्या वृत्तीची जणू ती दोन टोकाची रूपे होती. त्या दोन टोकांत चळवळींची अनेक बिंबे-प्रतिबिंबे होती.

या युवकांच्या अस्वस्थतेला कारणे होती. स्वातंत्र्याच्या आसपास जन्माला आलेली पिढी ७० साली वीस-पंचवीस वर्षांची झाली होती. त्यांच्या भाव-भावना आणि आकांक्षा वेगळ्या होत्या. तारुण्यामुळे तीव्रही होत्या. प्रश्नांची उत्तरे त्यांना मिळत नव्हती. वाढती बेकारी, भ्रष्टाचार, वशिलेबाजी, ढोंगी-भाषा, दलितांची पायदळी तुडविली जाणारी अस्मिता, आदिवासींची ससेहोलपट, शेतमजुरांचे हाल या साऱ्यांची त्यांना सुसंगत मांडणी, उत्तरे आणि कृती हवी होती. ते त्यांना मिळत नव्हते.

याचे सर्वप्रथम उत्तरदायित्व ज्या राजकीय पक्षावर होते त्याची स्थिती काय होती ?

काँग्रेसची नई रोशनीची पुकार, गरिबी हटावची भाषा ही बनवेगिरी आहे हे उमगत होते. मार्क्सवादी क्रांतीचा दावा करणारा भारतीय कम्युनिस्ट पक्ष काँग्रेसची तळी उचलण्याचे काम करत होता. भारतीय क्रांतीच्या वास्तवाचे भान आहे असे स्वतःला समजणारे समाजवादी संयुक्त सरकारे– बडी आघाडी या खेळातच अडकून पडले होते.

डॉ० बाबासाहेबांचा वारसा सांगणारा महाराष्ट्रातला रिपब्लिकन पक्ष हा संधिसाधू बनला आहे असे इथल्या तरुण दलिताला जाणवत होते. या अस्वस्थतेमधून महाराष्ट्रातील युवक चळवळ उभी राहिली, स्वतःच प्रश्नाची उत्तरे शोधावयाचे त्यांनी ठरविले. चळवळ करण्याची ही अस्वस्थता हेच तरुणाचे प्रमुख लक्षण होते.

एक तत्त्वज्ञान, आखीवरेखीव संघटन, शिस्तबद्ध कार्यक्रम असे ही चळवळ उभी करणाऱ्या संघटनांचे स्वरूप नव्हते. संघटना अनेक होत्या. विचारात मतभिन्नता होती. कार्यक्षेत्रे, कार्यपद्धती वेगवेगळी होती पण या सर्वांची मिळून बनणारी चळवळ ही तरुणांची चळवळ आहे असे म्हणावे अशी काही वैशिष्ट्ये त्यात नक्की होती. संघटनामधील बहुसंख्य कार्यकर्ते वयाने पंचवीसच्या आतबाहेरचे होते, हे एक साधे बाह्य लक्षण झाले. प्रस्थापिताशी झुंज देण्याची तयारी हे जे तारुण्याचे खरे लक्षण ते यापैकी बहुतेक संघटनात होते. आम्ही ' ॲन्टी-एस्टॅब्लिशमेंट ' आहोत अशी बिरुदा-

वली ते अभिमानाने मिरवीत असत. अनेक संघटनांनी स्वतःच्या नावात युवक हा शब्द आग्रहाने वापरला होता. जसे : युवक क्रांतिदल, छात्र-युवा संघर्षवाहिनी, समाजवादी युवक दल; आणि जिथे हा शब्द नव्हता तिथेही आशय युवक चळवळीशी जवळीक साधणाराच होता. अन्यायाच्या दाहक दर्शनाविरुद्ध उठाव असे त्याचे स्वरूप होते.

राजकीय पक्ष निवडणुकांच्या रिंगणात रंगून गेलेले होते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचे अनेक प्रश्न दुर्लक्षित झाले होते. त्यावर बोलणारा, लढ्याची उभारी देणारा कोणी त्राता त्या त्या जनसमूहांना हवा होता. आपल्या मर्यादित कार्यक्षेत्रात तरुणांच्या या विविध संघटनांनी हे काम केले. दलितांना अस्मितेची जाण देणारी आणि सवर्णांना समतेची साद देणारी एक गाव एक पाणवठा चळवळ महाराष्ट्रातील दूरवरच्या अनेक खेडोपाडी पोचली. आदिवासींच्या बेहिशोबी, बेकायदेशीर पद्धतीने हस्तांतरित झालेल्या हजारो एकर जमिनीची तड लावण्याचा, ती परत मिळवून कसण्याचा प्रयत्न धुळे ठाणे जिल्ह्यात प्रभावीपणे झाला. इनामी जमिनी, गायरान जमिनी, यांचे लढे लढले गेले. जे आता अस्तित्वातच नाहीत असे शासन सांगत होते त्या वेठबिगारांची सुटका करून त्यांचे प्रश्न धसाला लावण्यात आले. ठिकठिकाणी भ्रष्टाचाराविरुद्ध झुंज देण्यात आली. लाच खाणाऱ्याला गाढवावर बसवून धिंड काढण्यापर्यंत टोकाची भूमिका घेण्यात आली. विदर्भात हुंडाविरोधी निदर्शने, चळवळी यांनी जोर पकडला, स्त्री अत्याचाराची प्रकरणे धसास लावण्यात आली. शेतमजुरांचे किमान वेतन आणि त्याची योग्य अंमलबजावणी यासाठी एकेका तालुक्यात दहा दहा हजार शेतमजूर रस्त्यावर आले, लढले, स्वतःचे शक्ती केंद्र त्यांनी उभे केले. भटक्या जाती-जमातीच्या फार काल निद्रिस्त असलेल्या फार मोठ्या जनसमूहाला जागे करण्यात आले. स्वतःची झोळी कटोरा, वेड्या त्यांनी जाहीरपणे जाळल्या. विज्ञानाभिमुख दृष्टी पोचविण्यासाठी आणि अंधश्रद्धेविरुद्ध डोळे उघडण्यासाठी महाराष्ट्रव्यापी प्रचंड विज्ञानयात्रा निघाली, तिला जत्रेसारखी गर्दी लोटली. नामांतरासाठी अभूतपूर्व असा लाँगमार्च निघाला. लाखो सत्याग्रही तुरुंगात गेले. जातीयवादी हिंसक शक्तींचे आवाहन समर्थपणे पेलण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता परिषदा झाल्या. त्यासाठी प्रभावीपणे जनसंवाद झाले. मंडल आयोगाची अंमलबजावणी होण्यासाठी परिषदा, धरणे, मोर्चे सत्याग्रह याची मोहीम पार पडली.

या सगळ्या प्रवाहाकडे लक्ष टाकले तर साधारणपणे ७० ते ८५ या कालखंडात आकारास आलेल्या परिवर्तनाच्या चळवळीचे महाराष्ट्रातील चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. हे सारे संघटित करणारे प्रमुख शक्ती केंद्र हे महाराष्ट्रातील छोटे-मोठे क्रियाशील गट, त्यांनी सुटे सुटे वा संघटितपणे केलेले प्रयत्न हे होते. अशा तीस-चाळीस गटांची नावे ठळकपणे सांगता येतील, आणि छोटीमोठी सर्वांची यादी याहीपेक्षा बरीच होईल. रूढ राजकारणाच्या बाहेर असणारे हे संघटन हा महाराष्ट्रातल्या युवक चळवळी प्रमुख परिवर्तनवादी प्रवाह होता.

त्यामध्ये काही फरक होते, पण ते प्रभावक्षेत्र, प्राधान्याचे प्रश्न यायाबतचे होते. गरीब डोंगरी संघटना श्रमिक संघटना भूमिसेना या एका मर्यादित कार्यक्षेत्रात परंतु परिवर्तनाच्या सर्व बाजूंना स्पर्श करण्याचा प्रयत्न करत होत्या. जनसमूह प्रभावीपणे त्यांनी संघटित केले होते, करीत आहेत. काही संघटना दलितांचा, अंधश्रद्धांचा, स्त्रियांचा असा एक एकच प्रश्न घेऊन महाराष्ट्रभर प्रबोधन संघर्ष करत होत्या. काही संघटना एकूण परिवर्तनाच्या प्रश्नाची नवी मांडणी, वर्ग वर्ण लढा एकत्रितपणे लढण्याची गरज, याचे व्यावहारिक आणि वैचारिक अंग महाराष्ट्रभर चळवळ प्रवाही करून पुढे आणण्याचा प्रयत्न करत होत्या.

या पलीकडे युवक चळवळी म्हणता येतील अशा दोन प्रचाराच्या संघटनांचा उल्लेख करता येईल. त्यापैकी एक गट प्रामुख्याने तरुणांच्याच संघटना, विशेषतः कॉलेज युवकांच्या म्हणून काम करील. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, छात्रभारती, स्टूडंट्स् फेडरेशन या स्वरूपाच्या या संघटना आहेत. यांपैकी काहींवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राजकीय पक्षांचा प्रभाव आहे. कॉलेज विद्यार्थ्यांच्यात आपल्या विचारानुसार गटबांधणी करणे, छोटे मोठे संघर्ष करणे असे त्यांचे स्वरूप आहे. कागदोपत्री मोठा व्याप असला तरी प्रभाव, म्हणून आज त्याची परिणामकारकता महाराष्ट्रातल्या युवक चळवळीत तेवढी नाही.

संघटनांचा तिसरा गट हा हिंदुत्ववादी विचारांचा आहे. त्या संघटनेमध्ये मोठ्या संख्येने तरुण गेले म्हणून त्यांना तरुणांच्या चळवळीशी जोडता येईल. शिवसेना, पतितपावन, हिंदु एकता या संघटना या गटात येतात. परिवर्तनाच्या विचाराशी त्यांचा संबंध नसल्याने त्यांचा विचार करण्याची गरज नाही. पण नोंद यासाठीच घ्यावयाची की तरुणांचा एक मोठा गट या चुकीच्या मार्गाने खेचण्यात त्यांना काही काळ लाभलेले यश लक्षात घेता परिवर्तनवादी युवक चळवळीला त्यापासून काय बोध घेता येईल हे समजून घेण्यासाठी.

स्वप्ने पहाणे हा तारुण्याचा सहजसुलभ धर्म आहे. त्यामुळे या युवक चळवळीचे स्वप्न मोठे असणे स्वाभाविक होते. कुंठित झालेल्या समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला आम्ही नवे मार्ग शोधून काढू असे हे स्वप्न होते. या नव्या मार्गाबरोबरच नवा आशयही मांडण्याचे अवघड काम पार पाडण्याची उमेद होती. युवक चळवळीला एक मूलभूत योगदान दिले ते मात्र चिरतरुण ही उपमा सार्थ ठरेल अशा जयप्रकाशजींनी. सत्ता कोणत्याही नावाने हातात आलेली असो; त्यात दोष शिरतात आणि ते मूळ उद्दिष्टाचा विसर पडावा इतक्या प्रमाणात वळावतात. तेव्हा सत्तेच्या संदर्भात तिहेरी उठावासाठी युवक चळवळ हे जयप्रकाशजींना उपयुक्त हत्यार वाटत होते. एकतर सत्ता अधिकाधिक जनहितदक्ष आणि जनताभिमुख होईल अशी धोरणे येण्यासाठी जनआंदोलने करणे. या आंदोलनांतून कायद्याच्या रूपाने जे अस्तित्वात येईल त्याची प्रभावी अंमलबजावणी जनतेच्या पदरात पाडून देणे ( केलेल्या कायद्यांची नीट अंमलबजावणी केली तरी एक लघुक्रांती पूर्ण होईल असे जयप्रकाशजी म्हणत ते या अर्थाने ) आणि सत्ता कोणत्याही पक्षाची असो ती ज्या प्रश्नाकडे लक्ष देणारच नाही, उदा. मुस्लीम प्रबोधन, अंधश्रद्धा, रूढींचा मुकाबला, त्याचे भान ठेवून त्याचा संघर्षही जारी ठेवणे. म्हणून जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीच्या उठावात जानवे तोडण्यास महत्त्वाचे स्थान होते. स्वहितकेंद्रित होत चाललेली कामगार चळवळ आणि अतिशय विखुरलेला अगदी तळातला शेतमजुरांचा समुदाय या दोन्हीपेक्षा सतत प्रवाही राहणारा युवक चळवळीचा ओघ जयप्रकाशजींना अधिक खात्रीचा व सामर्थ्यशाली वाटत होता. संवेदनशील, प्रस्थापितात हितसंबंध न गुंतलेला, विचार, नवी मूल्ये समजावून घेऊ शकणारा, काही प्रमाणात तरी समर्पित व संघर्षप्रवण होऊ शकणारा युवक आणि युवक चळवळही नव्या भारताची मांडणी करण्यासाठी जयप्रकाशजींना सर्वात जास्त आशादायी वाटत होती. युवक संघटनेच

सभासद राहण्यासाठी त्यांनी तीस वर्षापर्यंतची अट घातली होती. आणि तीस-नंतर त्यांनी काय करायचे अशी टीकाही त्यावर झाली होती. परंतु युवकांची एक विशिष्ट भूमिका डोळ्यांसमोर आणली तर वयाची अट अर्थपूर्ण होती. सामान्यतः तीस वयानंतर तरुण समाजजीवनाच्या कुठल्यातरी स्तरात आणि भूमिकेत स्थिरावतो. आज तो बहुधा अटळपणे प्रस्थापिताचा अंश बनतो. जर जयप्रकाशजींना अभिप्रेत असणारी सशक्त प्रवाही युवक चळवळ बाहेर अस्तित्वात असती तर त्या युवकांतला उद्याचा प्रौढ नागरिक बनणारा मोठा भाग हा चळवळीचा सहानुभूतीदार, पुरोगामी नागरिक, समाजजीवनाला उपयोगी पडणारी संस्था चालविणारा कार्यकर्ता, बिगरसंसदीय चळवळीतला वा संसदीय राजकारणातला साथी, यांपैकी कोणी बनेल असे ते स्वप्न होते. आणि ते वास्तवात उतरले असते तर इथला लोकशाही समाजवाद जास्त आशयघन झाला असता यात शंका नाही.

ज्या महाराष्ट्रात आधी उल्लेखलेल्या क्रियाशील गटांच्या कामाचे एक जाळे युवक चळवळीच्या रूपाने जनसमुदायापर्यंत विणले गेले होते त्या ठिकाणीही वस्तुस्थिती विदारकपणे वेगळी राहिली. अपेक्षाभंग करणारी ठरली.

समाजजीवनातले अनेक उपेक्षित पण महत्त्वाचे प्रश्न या चळवळीने पुढे आणले, त्याकडे लोकांचे लक्ष वेधले. ते सोडवले. त्या जनसमूहांना दिलासा दिला. हवा निर्माण केली; हे यश मान्य करत असतानाच तीन बाबतींत ही चळवळ बरीच अपुरी पडली.

(१) संघटनेच्या बांधणीकडे चळवळीचे दुर्लक्ष झाले. चळवळीतून वाढती संघटना बांधणी आणि त्या आधारे पुन्हा वाढती चळवळ असे घडले नाही. चळवळ ही प्रामुख्याने एखाद्या प्रश्नावरचा उठाव याच स्वरूपात राहिली. तो प्रश्न आणि परिवर्तनाचा व्यापक आशय यांची मांडणी आणि त्याला उपयोगी पडणारी संघटनात्मक जडणघडण असे झाले नाही. सर्व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन-तीन केंद्रे असणारे असे संघटन देखील उभे राहू शकले नाही. किंबहुना महाराष्ट्राच्या निम्म्या जिल्ह्यात पोचलेले असे संघटन देखील कोणाचेच उभे राहिले नाही. सर्वांनी मिळून एकत्रित उठाव केला तर चळवळीला व्यापक रूप येऊन हे अपयश झाकले जाई. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नामांतराचा लाँग मार्च व औरंगाबादचा सत्याग्रह. परंतु अशी उदाहरणे अपवादात्मकच राहिली.

(२) आहेत त्या गटांतही नवीन भरती फारशी झाली नाही. त्यामुळे चळवळीच्या प्रवाहांचे सातत्य व ताजेपणा टिकला नाही. काही नवीन गट्च उदयाला येण्याची प्रक्रिया आजही चालू आहे. पण एकूण चळवळीत नव्या युवकांना मोठ्या संख्येने आकर्षित करण्याची शक्ती खूपच कमी राहिली.

(३) ही चळवळ राजकारण करणारी नव्हती आणि ते योग्यच होते. पण या चळवळींने हातात घेतलेले व लढवलेले प्रश्न हे निवडणुकीपेक्षाही अधिक मूलभूत अर्थाने राजकारणाचाच भाग होते. त्यामुळे त्याचा परिणाम राजकीय प्रक्रियेवर व्हावयास हवा होता. प्रत्यक्षात मात्र असा राजकीय प्रभाव जवळजवळ पडला नाही. प्रस्थापितांचे मुख्य आणि मजबूत केंद्र जे राजकारण, त्याने या चळवळींची फारशी दखल घेतली नाही. सत्तेचे राजकारण, युवक चळवळींना डावलून निर्वेध चालूच होते.

गेल्या दोन दशकांत युवक चळवळीत प्रातिनिधिक म्हणता येईल असे साधारण तीन प्रवाह दिसतात.

महात्मा फुले, डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या आधारे परिवर्तनाची सम्यक् मांडणी करू इच्छिणाऱ्या संघटना, महात्मा गांधी, लोहिया, जयप्रकाश यांचा मागोवा घेत जाणाऱ्या तरुण चळवळी, भारताच्या वास्तवाला योग्य ठरेल अशा पद्धतीने मार्क्सवादाची मांडणी करू इच्छिणारे गट या सर्वांचाच प्रभाव काही काळ महाराष्ट्रात वा महाराष्ट्राच्या काही भागात चळवळरूपाने राहिला. आज तो ओसरत आहे.

आजच्या तरुणांची चार दिशेने ओढाताण चालू आहे. प्रस्थापितात आपली कसेही करून चांगली सोय लागावी यासाठी धडपडणे आणि स्वतः-पलीकडच्या जगाची काळजी न करता व्हीडिओ कल्चरमध्ये गुंतून जाणे हा एक रस्ता त्याला मोह पाडतो. दुसरा मार्ग एकारलेल्या चळवळीत तारुण्य-सुलभ उत्साहाने सामील होण्याचा आहे. त्यामुळे आक्रमक हिंदुत्वाचे त्याला आकर्षण वाटते आणि त्याचवेळी शेतकरी संघटनेचा लढाऊ पवित्रा त्याला खेचून घेतो. एकाच वेळी या दोन्ही चळवळींत सामील होण्याची विसंगती त्याला जाणवत नाही. तिसरीकडे तरुण तडफदार नेतृत्व मग ते राजीव गांधी असो वा शरद पवार यांची त्याला भूल पडते. चौथा मार्ग विधायक उत्साही कार्यक्रमाचा आहे. रक्तदान, हुंडाविरोधी परिषदा, वृक्षदिंडी, गिर्यारोहण अशा उपक्रमांचे त्याला अगत्य वाटते.

ज्या नव्या समाजाच्या उभारणीचे स्वप्न तरुणांच्या खांद्यावर आहे असे आपण मानतो त्यापासून हे मार्ग दूर आहेत. अपुरे आहेत. प्रस्थापितांना बिनतोड आणि बेदरकार टक्कर मारण्याच्या तयारीपासून युवक चळवळ आज तरी मला बरीच दूर दिसते.

आजच्या युवकांना आवाहन पोचते यावर माझा अनुभवसिद्ध विश्वास आहे. पण या आवाहनानंतर संघटना बांधणे, प्रवाही ठेवणे, कर्मकांडी स्वरूप न येता विधायक रचनात्मकता जोपासणे आणि याबरोबरच सतत संघर्षसन्मुख राहाणे याचा मात्र आज अभाव दिसतो.

दुसऱ्या बाजूला आज राजकारण आणि त्या माध्यमातूनच होणारे समाज-कारण हा जबर प्रवाह आहे. त्यामध्ये पैसा, जात, भ्रष्टाचार, गुंडगिरी, सत्तेचा विकृत हव्यास याची ताकद फार प्रभावी आहे. आहे त्या स्वरूपात तो विनाशाकडे नेईल याची मनात बहुसंख्यांना साधारण भीती वाटते आणि त्याच वेळी आपण याबाबत काही करू शकत नाही याची अगतिकता वाटते. याविरुद्ध काही करण्याची ताकद, किमान निर्धार कोणात आहे असे जनतेला वाटले तर प्रतिसाद केवढा प्रचंड असतो हे जयप्रकाशजींनी दाखवून दिले आहे. उद्याच्या युवक चळवळीला हे आव्हान आहे. राजकारण हे युवक चळवळीचे प्रत्यक्ष उत्तरदायित्व नाही. पण त्याला टाळून चालत नाही अशी स्थिती आहे, याचे कृतिशील भान ठेवून आणि गेल्या अडीच दशकांतल्या आपल्या वाटचालीतील उणिवा दूर करण्याचा निर्धार करून सशक्त युवक चळवळ उभी रहावयास हवी. असे झाले तर समाजपरिवर्तनाचे स्वप्न आणि आजचे वास्तव यातले अंतर ती कमी करू शकेल.

*

पन्नालाल सुराणा

# परिवर्तनवादी चळवळीपुढील आव्हाने

समाजात प्रगतिशील आणि प्रगतिविरोधी शक्तींमधील संघर्ष सतत चालू असतो. महाराष्ट्रातही गेली पंचवीस वर्षे पुरोगामी व प्रतिगामी शक्तींची रस्सीखेच चालू आहे. एका बाजूस समाजातील तळच्या थरांमध्ये स्वत्वाची नवी जाणीव निर्माण झाली असून न्याय्य हक्कांसाठी काही लढे व चळवळी झाल्या. दुसऱ्या बाजूस या आकांक्षा दडपून टाकू पाहणाऱ्या प्रस्थापितांची एकजूट होऊन त्यांनी प्रगतीचा प्रवाह रोखण्याचा उपद्व्याप सुरू केला. त्याच वेळी सबंध समाजातच सुखलोलुपता आणि चांगल्या-वाईटांचा विधिनिषेध न बाळगण्याची बेदरकार वृत्ती हे दुर्गुण वाढीस लागले आहेत. परिवर्तनवादी शक्ती या आव्हानांना कसे तोंड देतात यावर महाराष्ट्राची भविष्यातील वाटचाल अवलंबून आहे.

महाराष्ट्राच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या वाटचालीकडे नजर टाकली असता काही गोष्टी लक्ष वेधून घेतात. शिक्षणाचा प्रसार बराच झाला आहे. अंतर्भागातील काही खेडी व नागरी-ग्रामीण दोन्हीकडली गरीब मुले मुली अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, पण १९६० च्या मानाने साक्षरतेचे प्रमाण बरेच वाढले. विविध प्रकारच्या शिक्षणसंस्था ठिकठिकाणी उभ्या राहिल्या. वर्तमानपत्रांचा खप वाढला आहे. आकाशवाणीचे श्रोते व दूरदर्शनचे प्रेक्षक यांच्या संख्येत साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा अधिक वाढ झाली आहे.

आर्थिक क्षेत्रात असे दिसते की शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, बँकिंग विमा या सर्वच क्षेत्रांत वाढ झाली आहे. मात्र ती फार एकारलेल्या पद्धतीने झाली आहे. नवे, अधिक उत्पादनक्षम तंत्र सधन शेतकऱ्यांनी आत्मसात केले आहे. सरकारी खर्चाने बांधण्यात आलेल्या कालव्यांच्या परिसरात ऊस बागाईत वाढली. विहीर बागायतीत काही प्रमाणात कापूस, भुईमूग, द्राक्षे, इतर फळे यांचे क्षेत्र व उत्पादन वाढले. हे अर्थातच सधन शेतकरी करू शकला. ऑपरेशन फ्लडची पहिली अवस्था पूर्ण होऊन दुसरी चालू झाली. दुधाचे उत्पादन वाढले. पण ते बहुतांशी शहराकडे जाते. ग्रामीण भागात दुधाचा उपभोग अल्प प्रमाणातच वाढला आहे. ऊस बागायतीच्या क्षेत्रात सहकारी साखर कारखाने उभे राहिले. त्या त्या प्रदेशांचा कायापालट झाला. सहकारी सूत गिरण्याही वाढल्या. त्यांच्या अनुषंगाने इतर अर्थव्यवहार वाढण्याचे प्रमाण मात्र फार कमी आहे. बाकीची कारखानदारी वाढली ती मुंबई-पुणे-नासिक या त्रिकोणात. नागपूर सोलापूरकडले जुने कारखाने बंद पडले, नवे त्या प्रमाणात वाढले नाहीत. मुंबईमुळे कोकणात पैसा जात राहतो; मराठवाड्यात स्थानिक विकास व बाहेरून आवक दोन्ही कमी. व्यापार, वाहतूक, बँकिंग, विमा यांचा विस्तार ग्रामीण भागातही होऊ लागला आहे.

या शैक्षणिक व आर्थिक धडामोडींमुळे जागृतीचे क्षेत्र विस्तारत चालले आहे. नवनव्या समाजथरांना आपल्या अस्मितेची जाण येऊ लागली आहे. आपली उपेक्षा थांबावी, आपल्यावरील अन्याय दूर व्हावा, समाज व्यवहारात आपल्याला बरोबरीचे स्थान मिळावे यासाठी या विविध थरांतील बोलकी माणसे धडपडू लागली आहेत. परंपरागत जडतेच्या कवचातून बाहेर पडत आहेत; पण व्यापक, परिवर्तनवादी ध्येयवाद व चैतन्यशाली, शिस्तबद्ध संघटना यांचा ऱ्हास होत चालल्याने ती धडपड काही प्रमाणात दिशाहीन व बऱ्याच अंशी बेबंद होऊ लागली आहे. जुने राजकीय पक्ष, केंद्रीय कामगार संघटना, युवक संघटना खिळखिळ्या झाल्या आहेत. काही नव्या संघटना ताकदीने उभ्या राहिल्या असल्या तरी व्यापक समाजपरिवर्तनाची जबाबदारी त्या पार पाडू शकतील असे दिसत नाही.

तसे पाहिले तर संघटित क्षेत्रातील कामगार व मध्यमवर्गीय नोकर या वर्गांनी लढे करून आपल्या बऱ्याच मागण्या पदरात पाडून घेतल्या आहेत. १९६४ ते १९७५ या काळात कामगारांचे मोठमोठे संप झाले. ८·३३%

तीचा बोनस, निर्देशांकानुसार महागाई भत्ता, पगारवाढ, घरभाडे, सुट्या,
वगैरेंबाबत अनेक सवलती त्यांना मिळाल्या आहेत. १९७५ ते ७७ या
णीबाणीच्या काळात कामगार चळवळ थंड होती. १९७७ नंतर सरकारी-
मसरकारी कर्मचाऱ्यांनी ५४ दिवसांचा संप केला. तत्कालीन सरकारने
श्री० वसंतदादाच त्यावेळी मुख्यमंत्री होते ) त्यांच्या मागण्या मान्य केल्या
हीत. पण त्यानंतर सत्तेवर आलेल्या पुलोद मंत्रिमंडळाने त्यांच्या
याच मागण्या मान्य केल्या. मुंबईतील कापड गिरणी कामगारांचा संप
न वर्षे झाली, चालूच आहे. या संपाने काही कामगार कायमचे देशो-
धडीला लागले, तर काही गिरण्या कायमच्या बंद पडल्या. सरकारने संप
डण्यासाठी दडपशाही केली नाही व कामगारांच्या पदरात काही माप
वे यासाठीही हालचाल केली नाही. या संपाची जी स्थिती झाली
त्या कामगार चळवळीवर बराच परिणाम झाला. मुंबईत या संपाचे
व करणाऱ्या श्री० दत्ता सामंत यांचा वट वाढला. त्यांनी कुठल्याही
कीय पक्षाशी किंवा विचारसरणीशी बांधिलकी मानलेली नाही. परि-
तः इंटक, आयटक, हिंद मजदूर सभा, सिटू, भारतीय मजदूर संघ,
( मजदूर किसान पंचायत– या राष्ट्रीय पातळीवरील पक्षांशी
धित असणाऱ्या केंद्रीय कामगार संघटनांचा प्रभाव ओसरला आहे.
मवर्गीय कर्मचारी व संघटित औद्योगिक कामगार पूर्णतया अर्थवादी
ळा असल्याचे दृश्य दिसत आहे. लहान लहान शहरांतील कामगार
टना खूपच कमजोर झाल्या आहेत. त्यांना तर त्यांच्या सभासदांचे प्रश्न
ला लावण्याचेही बळ राहिलेले नाही. इतर राजकीय किंवा सामाजिक
ळवळींशी नाते जोडणे दुरापास्त झाले आहे. नाही म्हणायला विडी
गार, हमाल, साखर कामगार, यंत्रमाग कामगार यांच्या ज्या संघटना
युनिस्ट, समाजवादी व लाल निशाण कार्यकर्ते चालवीत आहेत त्यांचा
कारणाशी थोडातरी संबंध टिकून आहे.

शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा, शेतमालाच्या घाऊक व्यापाराचे
राजीकरण व्हावे या मागण्यांसाठी १९६४ ते १९७२ या काळात पश्चिम
राष्ट्र-मराठवाड्यात शे० का० प०, समाजवादी व कम्युनिस्ट पक्षांनी
उभारले होते. विदर्भात कापूस उत्पादक संघाने चांगली चळवळ
वली होती. या चळवळींच्या दडपणामुळे कापूस एकाधिकार खरेदी
ना सुरू झाली. ज्वारी, गहू, कांदा यांच्या हमी भावात वाढ मिळाली
रकारी खरेदी सुरू झाली. १९८० मध्ये श्री० शरद जोशी यांच्या
टनेने कांदा व ऊस यांचे भाव वाढवून मिळावेत यासाठी उग्र आंदोलने
. त्या दोन जिनसांचे भाव थोडे वाढवून मिळाले. शरद जोशींची
करी संघटना शक्तिशाली बनली. शेतमालाच्या भावाचा प्रश्न मांडणारे
णच पाहिले व एकमेव शेतकऱ्यांचे कैवारी आहोत असा प्रचार त्यांनी
व जनमनातही तसे चित्र उभे राहिले. १९८५ च्या विधानसभा
डणुकीपर्यंत शेतकरी संघटनेने सर्व राजकीय पक्ष शेतकऱ्यांची फसवणूक
त आहेत असा प्रचार चालवला होता. १९८५ च्या विधानसभा
डणुकीत मात्र त्यांनी पुलोद आघाडीला पाठिंबा दिला. शेतमालाचे
फायतशीर भाव बांधून मिळावेत हा एककलमी कार्यक्रम म्हणजे शेती-
षक सर्व प्रश्नांची गुरुकिल्ली होय अशी शेतकरी संघटनेची भूमिका आहे.
धिकार खरेदीबाबतसुद्धा त्यांची भूमिका संदिग्ध आहे. परिणामतः
संबंधी विविध, निकडीच्या प्रश्नांविषयी या शेतकरी-कैवारी संघटनेला
काही म्हणायचे नसते. दीर्घकालीन सम्यक् धोरणांचा पाठपुरावा करणे, त्या अनुषंगाने शेतकरी वर्गाचे व सकल समाजाचे प्रबोधन करणे हे त्या संघटनेमार्फत होत नाही व इतर पक्षांकडूनही ते काम थांबल्यासारखे झाले आहे. ग्रामीण भागातील इतर सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांशी तर या संघटनेचा संबंध येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्या संघटनेला ही भूमिका सोयीची वाटत असली तरी एकंदर परिवर्तनवादी चळवळीच्या मार्गात मात्र त्यामुळे मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.

महाराष्ट्रातील श्रमिकवर्गात जवळपास तिसऱ्या हिश्श्याने असलेल्या शेत-मजुरांची स्थिती फारच हलाखीची आहे. उपजीविकेचे हक्काचे वा निश्चित साधन नाही ही त्या वर्गाची सर्वात मोठी अडचण आहे. १९६६ ते १९७१ या काळात किमान वेतन, रोजगार हमी व शेतजमिनीचे फेरवाटप या मागण्यांवर त्यावेळचे समाजवादी, रिपब्लिकन व कम्युनिस्ट पक्ष चळवळी चालवीत होते. १९७० साली महाराष्ट्रातील भूमिमुक्ती आंदोलनाने सर्व समाजाचे लक्ष त्या प्रश्नाकडे खेचून घेतले होते. १९७२ ते ७४ या काळात दुष्काळ निवारण व निर्मूलनसंबंधी विविध मागण्यांवर चळवळी होत राहिल्या. त्यांतूनच रोजगार हमी योजना आकाराला आली व पुढे तिला कायद्याचे रूप प्राप्त झाले. १९७५ पासून त्यांची चळवळ विस्कळीत झाली. शेतकरी शेतमजूर पंचायत, किसान सभा, भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी परिषद या संघटना अद्यापही क्रियाशील आहेत. पण धारदार मोहीम व प्रभावशाली कृती होताना दिसत नाही. शेतजमिनीच्या क्रांति-कारक फेरवाटपाचा प्रश्न धसाला लावला पाहिजे असे म्हणायला कुणी धजत नाही !

गरीब आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे मोठ्या प्रमाणावर गेल्या होत्या. तसेच अनेक ठिकाणी जंगल जमिनीवर अतिक्रमण करून आदिवासींनी वहीत केलेल्या जमिनींचे पट्टे त्यांच्या नावाने झालेले नव्हते. जंगलातील काही वस्तू वैयक्तिक उपभोगासाठी विनामूल्य नेण्याचा आदिवासींचा हक्क काही ठिकाणी हिरावून घेतला गेला होता. या प्रश्नांवर १९६० पासून ठिकठिकाणी चळवळी होत होत्या. समाजवादी, कम्युनिस्ट पक्षांचे कार्यकर्ते व काही परिवर्तनवादी तरुण या चळवळी चालवत होते. १९७४ साली या संदर्भात राष्ट्रीय व राज्य पातळीवर महत्त्वपूर्ण हालचाली होऊन आदिवासींना जमिनी व इतर हक्क मिळवून देणारे कायदे झाले. आणीबाणीच्या काळात या कायद्यांची अंमलबजावणी सुरू झाली. पण फारशी समाधानकारक झाली नाही. १९७७ नंतर, विशेषतः पुलोद राजवटीत अतिक्रमित जमिनींचे पट्टे देण्याचे काम काही प्रमाणात झाले. पण उपरोक्त कायदे व सरकारी निर्णय यांच्या अंमलबजावणीत भ्रष्टाचार न होता खऱ्या गरजूंना न्याय मिळावा यासाठी जागरूकपणे प्रयत्न करणारे काही गट काही भागांत काम करत असले तरी राज्य पातळीवर सुनियोजित हालचाल होताना दिसत नाही.

सामाजिक विषमतेविरुद्ध काही उल्लेखनीय उपक्रम व लढे १९७२ ते १९७४ आणि परत १९८० ते ८५ या काळात झालेले दिसतात. डॉ० बाबा आढावांनी सुरू केलेल्या ‘ एक गाव एक पाणवठा ’ मोहिमेस काही काळ चांगलीच धार आली होती. चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारांविरुद्ध व्यापक प्रचार मोहिमा चालवल्या गेल्या. मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. हमीद दलवाईंनी मुस्लिम सामाजिक सुधारणांना चालना दिली व तलाकपीडित स्त्रियांचा प्रश्न महाराष्ट्राच्या चावडीवर मांडला गेला.

देवदासींच्या प्रश्नाला वाचा फुटली. आतापर्यंत उपेक्षित राहिलेल्या भटक्या-विमुक्त जातींचा प्रश्न समाजापुढे प्रकर्षाने मांडला जाऊ लागला. नामांतराच्या प्रश्नाने व चळवळीने तर अवघा महाराष्ट्र ढवळून निघाला. स्त्रीमुक्तीची चळवळ बाळसे धरू लागली. यापैकी काही प्रश्न धसाला लागले. काही ठिकाणी न्याय मिळाला, पण या विविध प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करणारी व दिवसामासाने वाढत जाणारी संघटना वा चळवळ उभी राहिलेली दिसत नाही.

राजकीय क्षेत्रातील पडझड तर फारच विदारक आहे. १९६० ते १९७२–७४ या काळात महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष हा बराचसा एकसंध व ताकदवान होता. आणि शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी, जनसंघ व कम्युनिस्ट हे पक्ष आपापल्या विचारसरणीशी एकनिष्ठ राहून जनतेच्या न्याय्य गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे व सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम करीत होते. त्यांची विधिमंडळातील व बाहेरील ताकद कमी असली तरी जन-मानसात त्यांच्याबद्दल आदर होता व सत्ताधाऱ्यांना त्यांचा वचक वाटायचा. १९५६ साली महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा खांद्यावर घेऊन यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेस पक्षाला एक आकार दिला होता. निर्णयप्रक्रियेची घडी घालून दिली होती. स्थानिक गटबाजी मधूनमधून होत असली तरी राज्य पातळीवरील नेतृत्वाचा शब्द प्रमाण मानला जायचा. १९६२ साली यशवंतराव केंद्र सरकारात गेल्यानंतर वसंतराव नाईकांनी अकरा वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळले व काँग्रेसपक्षाचे नेतृत्व केले. त्यांच्याबद्दल काहीजण धुसफूस करीत होते, तरी सर्वांना ते सांभाळून घेत होते व पक्ष संघटनेवर त्यांची पकड होती. १९७४ साली मराठा लॉबीने त्यांच्याविरुद्ध उठाव करून त्यांना मुख्यमंत्रिपदावरून हटविले. तेव्हापासून त्या पक्षात राज्य पातळीवर गटबाजी सुरू झाली व तिला जीवघेणी धार चढत गेली. १९७७ साली लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे गटबाजीने परत उचल खाल्ली. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी त्या पक्षात राष्ट्रीय पातळीवरच फूट पडली होती. स्वर्णसिंग काँग्रेस व काँग्रेस (आय) या दोहोंना मिळून जेमतेम बहुमत मिळवता आले. एका पक्षातील गटबाजी दोन पक्षांच्या रूपाने अधिक धसमुसळेपणा करू लागली. श्री० शरद पवारांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला व जनता पक्षाच्या सहकार्याने पुलोद मंत्रिमंडळ बनवले, हा काँग्रेस (आय) व वसंतदादांच्या काँग्रेस पक्षाला जबरदस्त धक्का होता सत्तेशिवाय जगणे काँग्रेसवाल्यांना अवघड असते. पक्षपातळीवर त्या दोन पक्षांचे काही कामच होत नव्हते. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस (आय) पक्षाला प्रचंड यश मिळाले, परिणामतः वसंतदादांचा काँग्रेसपक्ष आय-काँग्रेसमध्ये विलीन झाला. लवकरच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्या पक्षाला घवघवीत यश मिळाले. पण राज्य पातळीवरील गटबाजी चालूच राहिली. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री झाले. पक्षातील भांडणे उघडपणे व बेदरकारपणे चालत राहिली. सत्तास्थानांसाठी झोंबाझोंबी यापलीकडे त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना दुसरे कामच राहिले नाही.

१९८५ च्या विधानसभा निवडणुकात त्या पक्षाला निसटते बहुमत मिळाले. पक्ष सत्तेवर आहे म्हणून तो पक्ष टिकून आहे. पण प्रशासन-यंत्रणेवरील पकड कमालीची ढिली झाली आहे. राज्यापुढील महत्त्वाच्या प्रश्नांची वेळीच दखल घेणे, ते सोडविण्यासाठी दमदार पावले उचलणे, आपला घोषित कार्यक्रम अमलात आणण्यासाठी प्रयत्न करणे व तो लोकांना समजावून सांगणे असले कुठलेही काम करण्याची इच्छा वा धमक त्या पक्षात राहिलेली नाही. केंद्रीय पातळीवरील एकमेव नेत्याचा जयघोष करणे व सत्तास्पर्धेच्या घाणीत लोळत पडणे या पलीकडे दुसरे काहीही कार्य त्या पक्षाचे कार्यकर्ते करताना दिसत नाहीत.

१९७५ ते ७७ च्या आणीबाणीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी व लोकशाही वाचवण्यासाठी जनता पक्षाची स्थापना राष्ट्रीय पातळीवर झाली. महाराष्ट्रातील समाजवादी व जनसंघ हे पक्ष त्या पक्षात विलीन झाले. संघटना काँग्रेस व काही बंडखोर काँग्रेसवालेही त्यात आले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकांत जनता पक्ष व त्याच्याशी सहकार्य करणाऱ्या शे० का० पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व रिपब्लिकन पक्ष, कांबळे व खोब्रागडे गट यांना बहुसंख्य जागा मिळाल्या. केंद्रात जनता पक्ष सत्ताधारी बनला. अनेक अपक्षांचा व काँग्रेसवाल्यांचा या पक्षाकडे ओघ सुरू झाला. पक्ष पातळीवर काय कार्य करायचे याबाबती सुस्पष्ट आखणी राष्ट्रीय पातळीवर झाली नाही. सत्ताधारी पक्षात चालणारी झोंबाझोंबी याही पक्षात सुरू झाली. जुने पक्ष विलीन झाले तरी अंतर्गत गट म्हणून ते काम करत राहिले. गटबाजीला ऊत आला. जनसंघ गटाला समाजवादी गट हा आपला खरा प्रतिस्पर्धी आहे असे वाटत होते. त्यांनी इतरांच्या साहाय्याने त्या गटाला नामोहरम करण्याचा चंग बांधला. त्यासाठी सर्व सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब केला. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत जनता व मित्र पक्षांना बहुमत मिळाले नाही तरी सर्वात अधिक जागा मिळाल्या. पुरोगामी विचाराचा नेता एकमताने निवडला असता तर जनता पक्षाला मंत्रिमंडळ बनवणे शक्य झाले असते. पण कुठल्याही परिस्थितीत समाज-वाद्यांचा वरचष्मा होऊ द्यायचा नाही हा जनसंघगटाचा निर्धार असल्याने ती संधी त्यांनी घालवली. पुढे श्री० शरद पवार काँग्रेसमधून बंड करून बाहेर आले. त्यांना नेता मानून जनता पक्ष सत्तेत सहभागी झाला. मंत्रिमंडळाचे काम चांगले चालले. पण पक्षपातळीवर जनता पक्षातही गटबाजी चालू राहिली. १९७९ साली राष्ट्रीय पातळीवर या पक्षात फूट पडली. महाराष्ट्रातील जनता पक्षात त्यावेळी फारशी फूट झाली नाही. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत खूप कमी जागा मिळाल्या. काँग्रेस (आय) केंद्रात सत्तेवर आला. त्यामुळे काही जण जनता पक्ष सोडून तिकडे गेले. (त्यात पूर्वीचे समाजवादी वा जनसंघवाले कोणी नव्हते.) त्यानंतर द्विसदस्यवादाच्या प्रश्नावर जनसंघवाले जनता पक्षातून बाहेर पडले व त्यांनी भारतीय जनता पक्ष म्हणून आपला संसार थाटला. महाराष्ट्रातही जनसंघवाले बहुतेकजण त्या पक्षात गेले. त्याशिवाय मात्र फारसे कोणी त्यांच्याबरोबर गेले नाही. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत जनता, शे० का० प०, मार्क्सवादी व भारतीय कम्युनिस्ट व रिपब्लिकन (कांबळे) यांचा जागावाटपाबाबत समझोता झाला होता. शरद पवारांचा समाजवादी काँग्रेस व भाजप हे स्वतंत्रपणाने लढले. सगळ्यांचेच बळ कमी झाले. जनता पक्षाला अपेक्षा-भंगाचा जबर तडाखा बसला. त्यातून सावरून या पक्षाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चळवळी उभारण्याचा प्रयत्न केला. अंतर्गत गटबाजी कमी झाली असली तरी संपली नाही. पक्षाचे धोरणविषयक निवेदन काहीजण केवळ अलंकार मानू लागले. पक्षाचे दैनंदिन कार्य फारसे चालू राहिले नाही. सर्व लक्ष निवडणुकांवर केंद्रित झाल्याचे दृश्य निर्माण झाले. १९८४ च्या लोकसभा व १९८५ च्या विधानसभा निवडणुकात या पक्षाने आपली ताकद टिकवून ठेवली.

भाजपला एक शिस्तबद्ध पक्ष म्हणून काही काळ बरा प्रतिसाद मिळाला. पण गांधीवादी समाजवादाची घोषणा केल्याने त्या पक्षाची वैचारिक ओढाताण चालू राहिली. महाराष्ट्रापुरते तरी त्या पक्षाच्या बहुतेक सभासदांची जुन्या जनसंघी विचारसरणीवरच श्रद्धा असल्याने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची व परिवर्तनवादी कार्यक्रमाची भूमिका मनापासून घेऊन त्या दिशेने काम करणे त्यांना जमले नाही. १९८३ पासून काँग्रेस आय नेत्यांनी बरीचशी हिंदुत्ववादी भूमिका घेतल्याने भाजपला पाठिंबा कमी झाला आहे. शिवाय सत्तेसाठीचे डावपेच व भांडाभांडी यांची लागण या पक्षातही बरीच झाली आहे.

काही केंद्रातील आपली ताकद टिकवून धरणे या पलीकडे अधिक काही करण्याची जिद्द शे० का० पक्षात राहिलेली दिसत नाही. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने १९७१ पासून इंदिरा गांधींना पाठिंबा देण्याची भूमिका घेतली होती. कॉ० डांगे यांनी इंदिरा गांधींशी पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका घेऊन ऑल इंडिया कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. तो पक्ष रुजण्याची तर शक्यता नाहीच. मूळ पक्ष अधिक दुबळा मात्र झाला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आपले बळ त्यातल्या त्यात टिकवून धरले. पण महाराष्ट्राच्या राजकारणाला वळण देण्याची क्षमता या पक्षातही दिसत नाही.

रिपब्लिकन पक्ष फाटाफुटीच्या वावटळीतून बाहेर पडण्याचे चिन्ह नाही. त्यातले काही गट सत्ताधारी व विरोधी पक्षांशी आलटूनपालटून सहकार्य करतात. त्यामुळे त्यांची विश्वासार्हता संपली आहे. जुन्या नेत्यांविरुद्ध बंड करून दलित पँथरने दलित चळवळीत नवा जोम ओतण्याचा प्रयत्न केला. काही काळ हा गट चमकला. पण अंतर्गत भांडणे, नेत्यांचा भ्रष्टाचार व तत्सम दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाल्याने ही चळवळही शक्तिहीन बनली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील भारतीय रिपब्लिकन पक्ष नव्या उभारीने कामाला लागला आहे हे आशादायक चिन्ह आहे.

विदर्भातील महाविदर्भ संघर्ष समिती काही काळ बळ धरून उभी राहिली पण तीही आता नामशेष झाली आहे.

मुंबई परिसरात स्थानिक तरुणांना नोकऱ्यांत प्राधान्य मिळवून देण्याच्या प्रश्नावर उभी राहिलेली शिवसेना ही संघटना सुरुवातीला परभाषिकांच्या विरोधात होती. आता तिने मुस्लिमविरोध हा आपला मुख्य आधार बनवला आहे. मुस्लिम लीग व जमाते इस्लामी या संघटना महाराष्ट्रात तशा प्रभावशाली नव्हत्याच. तरी त्या तग धरून आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणात नव्याने महत्त्व पावलेला समाजवादी काँग्रेस हा पक्ष आहे. श्री० शरद पवारांसारखा तरुण व तडफदार नेता लाभल्याने या पक्षाने उभारी धरली आहे. १९७८ साली पुलोद मंत्रिमंडळाचे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी चांगली कामगिरी बजावली. त्यामुळे त्यांच्याविषयी तरुणांत आकर्षण वाढत गेले. १९८० च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांत त्यांनी मित्र पक्षांशी जमवून घेतले नाही. एकट्याने लढूनही त्यांना बरे यश मिळाले. पुढे यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस आयमध्ये प्रवेश करायचे ठरवले तेव्हा शरदरावांचे बरेच सहकारी त्या पक्षात गेले. तरी ते स्वतः विरोधी बाजूला टिकून राहिले. १९८४ च्या लोकसभा निवडणुका त्यांनी बळावर लढवल्या व उल्लेखनीय यश मिळविले. १९८५ च्या विधानसभा निवडणुकांसाठी शे० का० पक्ष, जनता व भाजप यांच्याबरोबर त्यांनी पुलोद आघाडी निर्माण केली. जनतेनेही त्यांना चांगला प्रतिसाद दिला. महाराष्ट्रात ते एक महत्त्वपूर्ण राजकीय नेते बनले आहेत. महाराष्ट्रापुढील प्रश्नांना हात घालून त्याबाबत आवाज उठविण्याचे व कमी-अधिक हालचाल करण्याचे काम ते करीत आहेत. ज्यांना मित्र मानले त्यांना सोबत घेऊन जाण्याचे त्यांनी केले तर महाराष्ट्राच्या कारभाराची सूत्रे त्यांच्याकडे येण्याची शक्यता आहे. पण पक्षपातळीवर फारसे आशादायक चित्र नाही. लोकप्रिय व साधन संपन्न नेत्याच्या नावावर जगणारा पक्ष असेच अद्याप त्या पक्षाचे स्वरूप आहे.

महाराष्ट्राची धुरा वाहण्याचे व येथील परिवर्तनवादी चळवळीला बनविण्याचे काम कुठल्या पक्षाच्या हातून होईल याविषयी भविष्य वर्तवणे अवघड आहे. एक मात्र दिसते आहे की, सत्ताकांक्षा व त्यासाठी करावयाची लटपटबाजी या रोगांनी सर्वच पक्षांना पछाडले आहे. समाजापुढील प्रश्नांचा अभ्यास करण्याचे, त्याबाबत विचारांची देवाणघेवाण करण्याचे वळण पार संपत चालले आहे. सुस्पष्ट ध्येयवाद, दुर्दम्य निर्धारशक्ती व आपल्या ध्येयपूर्तीसाठी वाटेल ती किंमत देण्याची तयारी असणारे नेतृत्व पुढे आल्याशिवाय जनसामान्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळणे अवघड आहे.

नवी आव्हाने स्वीकारणे हे तरुणांचे कार्य असते. महाराष्ट्रात तरुणांच्या चळवळी व संघटना चांगल्या प्रकारे चालत असत. आता ती परंपरा खंडित झाल्यासारखी दिसते. परिवर्तनवादी युवक संघटना शक्तिहीन झाल्या आहेत. ध्येयवादी युवकांचे काही गट ठाणे, नाशिक, धुळे, सातारा, औरंगाबाद, यवतमाळ, लातूर, परभणी, रायगड अशा काही जिल्ह्यांत क्रियाशील आहेत. आपापल्या परीने ते चांगले काम करीत आहेत. पण त्यांची भूमिका सीमित आहे. पक्षोपपक्षांच्या बजबजपुरीपासून अलिप्त राहून आपण आपल्या शक्तीनुसार कार्य करीत राहावे अशी त्यांची भूमिका आहे. कालपरत्वे त्यांच्यातही फाटाफुटीची लागण झाली आहे. पण मुख्य म्हणजे उंच आकाशात भरारी मारण्याची त्यांची तयारी नसल्याने इतरत्रच्या तरुणांकडून त्यांना प्रतिसाद मिळणे शक्य नाही.

गेल्या काही वर्षांत सबंध समाजातच सुखलोलुपता, कष्टाशिवाय भरपूर पैसा कमवण्याची इच्छा व चांगल्या-वाईटाचा विधिनिषेध न बाळगण्याची बेदरकार वृत्ती हे दुर्गुण वाढीस लागले आहेत. समाजातील प्रतिष्ठित, संपन्न थरात हे दोष आहेतच. त्यांची समाजाच्या साधनसामग्रीवर व पर्यायाने शासनयंत्रणेवर पकड असल्याने या अपप्रवृत्तींचा त्यांना त्रास न होता फायदाच होतो आहे. शोषित, पीडित, कष्टकरी वर्गात या अपप्रवृत्तींचे आकर्षण वाढले आहे. हे विकृतीकरण परिवर्तनवादी चळवळीला विघातक आहे. स्वतःचे स्वत्व कायम राखून उभारी धरल्याशिवाय शोषित कष्टकरी माणूस परिवर्तनवादी चळवळ बलशाली बनवू शकत नाही व तशी चळवळ वाढल्याशिवाय त्याला खरा न्याय, खरे सुख मिळू शकत नाही. म्हणून या अपप्रवृत्तींपासून नाही—रे थरांना कसे वाचवायचे व परिवर्तनवादी चळवळीत त्यांचा सहभाग कसा वाढवायचा हे आजच्या परिस्थितीचे खरे आव्हान आहे. तरुणांना या आव्हानाचे पुरेसे भान नाही. त्यांच्यातही विकृती वाढल्या आहेत. संजय गांधींनी उत्तेजन दिलेल्या प्रवृत्ती आज तरुणांना गुमराह करीत आहेत, कधी तो राजीव गांधीमागे धावताना दिसतो तर कधी पतित पावन, हिंदुएकता अशा भ्रमात अडकलेला आढळतो. युवकांचे वाढते विकृतीकरण ( लंपनायझेशन ) ही परिवर्तनवादी चळवळीपुढील मोठी समस्या आहे व तेच आव्हानही आहे. महाराष्ट्राची जनता, इथल्या परिवर्तनवादी शक्ती हे आव्हान कसे स्वीकारतात यावरच या राज्याची भविष्यातील वाटचाल अवलंबून आहे. ◎ ◎

गणपत पाटील मुरबाडकर

# महाराष्ट्रातील शेतीचे उद्ध्वस्त विश्व

आधुनिक विज्ञानाचा उपयोग करून महाराष्ट्र भूमी सुजला होईल आणि आपण ती सुफला करू असे स्वप्न मराठी शेतकरी पाहात होता. परंतु अपुरा पाणीपुरवठा, अपुरा बीजपुरवठा आणि प्रत्येक दशकात दोन वर्षे तरी बसणारा दुष्काळाचा फटका, यामुळे शेतकरी आभाळाकडेच डोळे लावून बसला आहे. जेथे पीक बरे येते, तेथे शेतमालास किफायतशीर भाव नसल्याने अनेक तरुण शेतीचा व्यवसाय सोडू लागले आहेत.

धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. जेथे पाणी मिळाले, तेथे कर्तबगारीने शेती व सहकारी चळवळ फुलविणारा शेतकरी आणि प्रतिकूल परिस्थितीशी चिवट झुंज देणारे शेतमजूर व अल्पभूधारक यांच्यावरच शेतीचे भवितव्य अवलंबून आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या १९६० मध्ये ३ कोटी ९६ लाख होती, तर १९८५ मध्ये ती अंदाजे ७ कोटी १९ लाख झाली. १९६० साली १ कोटी ८८ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली होती; तिच्यापैकी ६ टक्के म्हणजे सुमारे ६ लाख १४ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली होती. १९८५ मध्ये लागवडीखालील जमीन २ कोटी १ लाख हेक्टर असून त्यांतील १३ टक्के, म्हणजे अंदाजे २६ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. १९६० साली तांदूळ, ज्वारी, गहू आदी धान्यांचे उत्पादन ८७ लाख मेट्रिक टन झाले, तर १९८४–८५ मध्ये ते उत्पादन अंदाजे ९७ लाख मेट्रिक टन झालेले आहे. १९६० मध्ये डाळीचे उत्पादन ९ लाख ९० हजार मेट्रिक टन, गळिताच्या धान्याचे उत्पादन ८ लाख ७० हजार मेट्रिक टन, आणि उसाचे उत्पादन ५६ हजार मेट्रिक टन झाले. तर १९८४–८५ मध्ये डाळी १२ लाख ५८ हजार मेट्रिक टन, गळिताची धान्ये १४ लाख ४९ हजार मेट्रिक टन आणि ऊस २८ लाख ३ हजार मेट्रिक टन असे उत्पादन झाले. कापसाचे उत्पादन मात्र गेल्या २५ वर्षांत घटले. १९६० साली कापसाच्या १६ लाख ७३ हजार गासड्या, तर १९८४–८५ मध्ये ८ लाख १४ हजार गासड्या– अशी तफावत या उत्पादनात पडली.

गेल्या २५ वर्षांत १९६२ व १९७२ मध्ये महाराष्ट्राला दुष्काळाचा जबरदस्त तडाखा बसला आणि १९८२–८३ व ८३–८४ मध्येही अनेक विभागांत दुष्काळी परिस्थिती होती. आजही महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक शेतकऱ्यांच्या जीवनावर दुष्काळाचे अभद्र सावट पडले आहे. प्रत्येक दुष्काळाच्या वेळी पाझर तलावासारखी शेतीस उपयोगी पडतील अशी कामे करण्यात आली. नालाबंडिंगही अनेक ठिकाणी झालेले आहे. परंतु अनियमित व अपुऱ्या पावसामुळे विशेषतः जिराईत भागातील शेतकऱ्यांचे जीवन डबघाईस आले आहे. महाराष्ट्रात ब्रिटिश अमदानीत रयतवारी पद्धतच होती आणि स्वातंत्र्यानंतर 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर आधारलेला कायदा झाल्यावर अनेक कुळांना जमिनीची मालकी मिळाली. शेतजमिनीबाबतच्या सीलिंग-कायद्यामुळे जमिनीची विषम वाटणी कमी व्हावी, अशी अपेक्षा होती. परंतु मोठ्या शेतकऱ्यांनी, विशेषतः बागाईत भागातील, कायद्यातून पळवाटा काढून जमीन त्यांच्या कुटुंबाकडेच राहील अशी व्यवस्था केली, तरीही हे मान्य केलेच पाहिजे की, उत्तर प्रदेश वा बिहार येथे मूठभर जमीनदारांकडे लक्षावधी एकर जमीन आहे, तशी परिस्थिती महाराष्ट्रात नाही.

महाराष्ट्रात शेतमजुरांची संख्या फार मोठी आहे. जिराईत शेती करणाऱ्या आणि विशेषतः ८७ दुष्काळी तालुक्यांतील अनेक शेतकऱ्यांना वर्षातून काही महिने उपजीविकेसाठी मजुरी करावी लागते. भूमिहीन शेत-मजुरांना जगण्याची किमान शाश्वती तरी असावी

यासाठी रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली. या योजनेतून शेतीला पूरक उत्पादक कामे करून घेऊन महाराष्ट्रातील शेतीची पुनर्रचना करावी व त्यामुळे शेती उत्पादन वाढवून, शेतीचे स्वरूपच आमूलाग्र पालटावे आणि त्यामधून शेतमजुरांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा होती. परंतु हे अद्याप घडू शकले नाही. मात्र रोजगार हमीतील भ्रष्टाचार व अन्य दोष लक्षात घेतले तरीही या योजनेमुळे ग्रामीण भागातील लक्षावधी भूमिहीनांची उपासमार थांबली, हे मान्यच करावे लागेल. रोजगार हमी योजनेमुळेच ग्रामीण भागात शेतमजुरांना किमान वेतन मिळू लागले.

गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात काही धरणे झाली. अनेक उपसा सिंचन योजना झाल्या. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे झाले. पाझर तलाव झाले. विहिरींची संख्याही वाढली. परंतु अद्याप १३ टक्क्यांपेक्षा अधिक जमीन ओलिताखाली आलेली नाही आणि अन्नधान्याचे उत्पन्नही जेमतेम १० टक्के वाढले आहे. जेथे पाणी मिळाले, तेथे ऊस, कापूस अशी नगदी पिके शेतकरी घेत असताना पाण्याच्या वाटपातील विषमतेमुळे जिराईत शेतकऱ्यांत असंतोष निर्माण झालेला असून सिंचन योजनाद्वारा दिले जाणारे सर्व पाणी केवळ काही भागांपुरते मर्यादित न ठेवता त्या पाण्याचे वेगळ्या तऱ्हेने वाटप करावे, अशी मागणी केली जात आहे. भुसार पिके काढणाऱ्या शेतकऱ्यांसही एका पिकापुरता निश्चित पाणी पुरवठा व्हावा असा विचारही अनेक तज्ज्ञांनी मांडला आहे. काही गावांतून जिराईत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन पाणी साठवून, पंपाने गावात त्याचे समान वाटप करायचे असा प्रयोग केला आहे. 'पाणी पंचायती' ने पुरंदर तालुक्यात हा प्रयोग मोठ्या प्रमाणात यशस्वी करून दाखवला आहे. शेतीसाठी विजेचा पुरवठा नियमाने व स्वस्त दराने होणे आवश्यक असते. परंतु या बाबतीत शेतकऱ्यांची दुर्दशाच आहे. विहिरीवर पंप बसविण्यासाठी आवश्यक ते पैसे भरूनही अनेक ठिकाणी दोन दोन वर्षे वीज मिळत नाही. विजेच्या अनियमित पुरवठ्याने शेतकऱ्यांच्या मोटरी जळतात व पाण्याच्या अवेळी पुरवठ्याने अनेकदा पिकांचे नुकसानही होते. पाणी व वीज वाटपांतील भ्रष्टाचारासंबंधी कितीही लिहिले तरी अपुरेच होईल.

आतापर्यंतच्या विवेचनावरून महाराष्ट्रातील शेतकरी उपेक्षित राहिला आहे असे दिसून येईल. पोट भरण्याचे अन्य साधन नसल्यामुळे शेतीवर कशीबशी गुजराण करणारा शेतकऱ्यांचा मोठा वर्ग आहे. लोकसंख्या वाढल्यानंतर शेतीवरील भार वाढतोच. महाराष्ट्राची लोकसंख्या सात कोटींवर गेल्यामुळे आणि लोकसंख्येच्या प्रमाणात अन्य क्षेत्रात रोजगार निर्माण न झाल्यामुळे शेतीवरील भार वाढलेलाच आहे आणि तो शेतीस सहन होणे शक्य नसल्यामुळे अनेकांना गाव सोडून मुंबई-पुण्याकडे पोटासाठी धाव घ्यावी लागली आहे. महाराष्ट्राच्या काही भागात रोजगार हमी योजनेखालील रस्ते, खडी फोडणे आदी कामे संपल्यामुळे तेथील अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर यांना शेतीचा हंगाम संपल्यावर गाव सोडण्याशिवाय दुसरा मार्गच उरत नाही. जव्हार व मोरवाडा या तालुक्यांतील हजारो आदिवासी पावसाळा संपल्यावर गाव सोडून गुजरातकडे जगण्यासाठी जातात.

शेती व्यवसायातील भूमिहीन शेतमजूर आणि अवर्षणप्रवण भागातील शेतकरी यांच्याप्रमाणेच अल्प भूधारक शेतकऱ्यांची अतिशय दैना झाली आहे शेतीतून चांगले उत्पन्न येण्यासाठी बीबियाणे, खते व कीटकनाशके वापरावी लागतात. यासाठी लागणारा पैसा या अल्पभूधारक शेतकऱ्यांजवळ नसल्यामुळे त्यांची शेती निकृष्ट दर्जाची झालेली आहे. शासनाच्या विविध योजनांखाली शेतकऱ्यांनी कर्जे घेतले आणि ते फेडण्याची कुवत नसल्याने अनेक ठिकाणी शेतकऱ्यांवर जप्ती आल्यामुळे सर्वस्व गमावण्याची पाळी आली आहे. थोडी बरी परिस्थिती असलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या डोक्यावर भूविकास बँकेचे अगर अन्य सहकारी संस्थांचे कर्ज टांगत्या तलवारीप्रमाणे आहे. एक वर्ष दुष्काळ पडला की तीन वर्षे शेतकरी गाळात रुतून बसतो. १९७२ सालच्या भीषण दुष्काळात महाराष्ट्रातील जिराईत शेती करणाऱ्या जवळजवळ सर्व शेतकऱ्यांची आणि बागाईत भागातीलही अनेक शेतकऱ्यांची शेती उद्ध्वस्त झाली आणि यातून सावरण्यास १९७६ साल उगवले. गेल्या नऊ वर्षांतही अपुऱ्या व अनियमित पावसामुळे महाराष्ट्रातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. ज्या भागात जमिनीला पाणी नियमाने मिळते तेथे शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने व कष्टाने शेती करून उसासारखे हुकमी


१ मे महाराष्ट्र दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

★

**चाफळकर अँड सन्स**

मुख्य कार्यालय :

★ **प्रताप टॉकीज, सांगली**

संबंधित चित्रपटगृहे

★ **राधाकृष्ण चित्रमंदिर**

व

★ **लता टॉकीज, रत्नागिरी**

पैसा देणारे पीक काढून सहकारी साखर कारखाने काढण्यात पुढाकार घेतलेला आहे. काही भागात द्राक्षे उत्तम होतात, परंतु एकूण परिस्थिती पाहता महाराष्ट्रात सधन शेतकऱ्यांची काही तुरळक बेटे असून ग्रामीण भागातील शेती कशीबशी रखडतच चालली आहे. शेतकरी दारिद्र्याने ग्रासलेला आहे. या अवस्थेतही प्रतिकूल परिस्थितीशी तो चिवटपणाने झुंज मात्र देत आहे.

महाराष्ट्रात कृषि–औद्योगिक समाजरचना निर्माण व्हावी, या विचाराचा १९६० सालापासून तेव्हाचे मुख्यमंत्री श्री० यशवंतराव चव्हाण यांनी आग्रह धरला. सर्वश्री वसंतदादा पाटील, विखे पाटील यांच्यासारख्या त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रात सहकारी चळवळीची उभारणी करून बागाईत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पराक्रमाचे नवे क्षेत्र मिळवून दिले. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना शेतीचे उत्पादन वाढावे म्हणून संकरित बियाणे वापरण्यावर खूप भर दिला गेला आणि याच काळात खते, कीटकनाशके आदींचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. १९६५ नंतर दोनतीन वर्षे पाऊस चांगला पडल्यामुळे पिके सर्वत्र चांगली आली. हे जणू आपल्यामुळेच घडले असे समजून शासनकर्ते, 'आम्ही हरित-क्रांती घडवून आणली' अशी शेखी मिरवू लागले. १९७२ च्या दुष्काळाचा फटका बसताच हे उसने अवसान मावळले. १९७० सालापासून शेतीचा जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाची वाढ व्हावी याकरिता शासनाने शेतकऱ्यांना अनेक प्रकारचे साहाय्य दिले, आणि शेतकऱ्यांनीही कष्टाने काम करून हा व्यवसाय धडाडीने सुरू केला. दुधाचा धंदा पूर्वी तोटयात चालत असे परंतु दुधाला चांगला भाव मिळू लागताच दुधाचे उत्पन्न प्रचंड प्रमाणावर वाढले.

शेतमालाला किफायतशीर भाव मिळत नसल्यामुळे महाराष्ट्राची शेती मागे पडत चालली आहे हे सत्य शरद जोशी यांनी अत्यंत प्रभावीपणे शेतकऱ्यांसमोर मांडले आणि त्यांच्या या प्रतिपादनामुळेच महाराष्ट्रातील शेतकरी जागा झाला व न्याय्य हक्कासाठी संघटित होऊ लागला. 'शेतकरी संघटने'ने केलेल्या आंदोलनात शेतकऱ्यांवर गोळीबार झाला. काहीजण बळी पडले आणि हजारो शेतकऱ्यांना लाठीमार सहन करावा लागला. या संघर्षामुळेच शेतकरी आंदोलनाची धार वाढली. निपाणीच्या तंबाखू आंदोलनात कोल्हापूरचे अनेक शेतकरी सामील झाले होते. शरद जोशी यांनी राजकीय पक्षांवर कठोर टीका केली. त्यामुळे मागणीबद्दल एकवाक्यता असूनही राजकीय पक्षांनी स्वतंत्रपणे शेतकऱ्यांची काही आंदोलने केली. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली निघालेली शेतकरी दिंडी, १ मे १९८१ ला महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्रितपणे मुंबईत केलेले विराट निदर्शन, जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा व शेतमजुरांचा महाराष्ट्रभर झालेला सत्याग्रह यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांना अधिक बळकटी आली. १९८५ त झालेल्या लोकसभेच्या व विधानसभेच्या निवडणुकांमध्ये शेतकरी संघटनेने विरोधी पक्षाच्या अनेक उमेदवारांना सक्रिय पाठिंबा दिला आणि विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांना प्रचारात अग्रस्थान दिले


# ग्राहक सेवेत अग्रेसर

| | | | |
|---|---|---|---|
| वार्षिक उलाढाल | : ३६ कोटी | शाखा | : १८ |
| सभासद | : १०९९७ | उत्पादन प्रकल्प | : ४ |
| डिपार्टमेंट स्टोअर्स | : ४ | | |

वाशी येथे लवकरच नवीन डिपार्टमेंट स्टोअर्स सुरू करीत आहोत.
शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठयपुस्तक वितरण व स्टेशनरी साहित्य उपलब्ध.

## मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी मंडळ लि०

**अपना बाजार को० ऑप डिपार्टमेंट स्टोअर्स**

**नायगाव, मुंबई ४०००१४**

आपले नम्र

| | | |
|---|---|---|
| **उपेंद्र चमणकर** | **चं. शं. करलकर** | **पी. ए. कांबळी** |
| कार्याध्यक्ष | उप कार्याध्यक्ष | प्रमुख व्यवस्थापक |

**सुरेश तावडे, प्रभाकर माने, उमेश माने**
मानद चिटणीस

अधिकारारूढ काँग्रेसपक्षामध्येही शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देणारे अनेक आमदार आहेत. या सर्वांच्या प्रयत्नांना अद्याप तरी यश आलेले नाही; परंतु १९६० साली असंघटित असलेला शेतकरी गेल्या ६-७ वर्षांत संघटित होऊ लागला आहे हे प्रगतीचे चिन्ह आहे.

महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजुरांच्यामध्ये दलितांची संख्या फार मोठी आहे. या दलित व अन्य भूमिहीन शेतमजुरांची एकत्रित संघटना करण्याचे प्रयत्न कोल्हापूर जिल्ह्यात श्री० बापूसाहेब पाटील यांनी केले असुन काही संघर्षांतून त्यांनी या भूमिहीन शेतमजुरांना न्यायही मिळवून दिला आहे शेतमजुरांची अशी संघटना उभारण्यासाठी व रोजगार हमीवरील शेतमजुरांना नियमानुसार काम मिळावे आणि त्यांची अन्य गाऱ्हाणी दूर व्हावी यासाठी ' शेतकरी-शेतमजूर पंचायत ' या संघटनेने महत्त्वाची कामगिरी केली आहे. या संघटनेद्वारा बा० न० राजहंस, सत्यवान कुंभारकर, विजय सिन्हा, रवींद्र वैद्य, मुकुंद कोल्हटकर, शंकर धोंडी पाटील आदी कार्यकर्त्यांनी शेतमजुरांमध्ये स्वाभिमान जागृत केला असुन त्यांच्या न्याय्य मागण्या समर्थपणे शासनापुढे मांडल्या आहेत. शेतकरी व शेतमजूर यांच्या हितसंबंधामध्ये संघर्ष नाही हे शेतकरी-शेतमजूर पंचायतीने प्रभावीपणे मांडले आहे. ही त्यांची महत्त्वाची कामगिरी मानली पाहिजे. शेतकरी-शेतमजूर पंचायतीची भूमिका काही बड्या शेतकरी नेत्यांना मान्य नाही ही मात्र वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्रात धरणे, कालवे व अन्य अनेक प्रकल्प झाले. विकासासाठी हे प्रकल्प आवश्यक होतेच; परंतु ते होताना अनेक शेतकऱ्यांची जमीन घ्यावी लागली आणि त्यामुळे उपजीविकेचे साधनच नष्ट होऊन हजारो शेतकरी विस्थापित झाले. या धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी सर्वश्री दत्ता देशमुख, कॉ० वसंत तुळपुळे, बाबा आढाव, दि० बा० पाटील, एन्० डी० पाटील आदींनी निकराचे प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने असंख्य प्रकल्पग्रस्त देशोधडीस लागले. कोयना धरणग्रस्तांचे अद्याप समाधानकारक पुनर्वसन झालेले नाही, या एकाच उदाहरणावरून हा प्रश्न किती बिकट आहे याची कल्पना येऊ शकेल. गेल्या वर्षी उरणभागातील प्रकल्पग्रस्तांनी प्रखर लढा दिला. गोळीबार, लाठीमार यांना तोंड दिले. या विस्थापित शेतकऱ्यांच्या लढाऊपणामुळे शासनाला अखेर नमावे लागले व शेतकऱ्यांना दर एकरी ३० हजार रुपयांहून अधिक रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळाली. मुंबईजवळ नुकसानभरपाईने हा प्रश्न सुटला तरी अन्य प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या गेलेल्या जमिनीबद्दल पर्यायी लाभक्षेत्रातील जमीन उपजीविकेसाठी मिळाली पाहिजे ही मागणी मान्य होत नाही तोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे हाल चालूच राहणार आहेत. आज तरी त्यांचे जीवन उद्ध्वस्तच झाले आहे ! या विस्थापितांची दुर्दशा समोर दिसत असतांना महाराष्ट्र शासनाने भोपाळपटनम् व इचमपल्ली या धरणांना मान्यता दिली असून यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील हजारो आदिवासींचे जीवन बरबाद होणार आहे. जंगलाच्या परिसरात आधुनिकतेचा स्पर्श ज्या आदिवासींच्या जीवनाला अलीकडेच झालेला आहे त्यांना चंद्रपूर-बल्लारपूरच्या औद्योगिक परिसरात ढकलले, तर त्यांचे पुनर्वसन होऊ शकणार नाही. शिवाय या दोन धरणांखाली हजारो एकरांतील सागाचे उत्तम जंगल नष्ट होणार आहे, परंतु गरीब आदिवासी आणि वनसंपत्ती यांच्याबद्दल कमालीचे बेफिकीर असलेल्या शासनाला त्याची फिकीर वाटत नाही.

महाराष्ट्रातील शेतीच्या दुर्दशेचे एक प्रमुख कारण म्हणजे येथे झालेली प्रचंड जंगलतोड हे आहे. स्वार्थी आणि लोभी कंत्राटदार आणि काही भ्रष्ट अधिकारी हेच मुख्यत: वनसंपत्तीच्या विनाशास कारणीभूत आहेत, परंतु या बाबतीत दोष मात्र दुर्दैवाने आदिवासींना देण्यात आलेला आहे. जंगलांची नीट वाढ व्हायची असेल तर आदिवासींना जंगलाचे संरक्षक बनवले पाहिजे, आणि त्या कामातून त्यांची उपजीविका चांगल्या रीतीने झाली पाहिजे. गेल्या १० वर्षांत महाराष्ट्रातील पावसाचे प्रमाण झपाट्याने कमी झाल्यावर जंगलांचे महत्त्व शासनाच्या लक्षात आले. गेल्या १० वर्षांत वनसंवर्धनाच्या बाबतीत सर्वसामान्य नागरिकही जागृत झाला असुन अनेक ठिकाणी झाडे लावण्याचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या बाबतीत अद्यापही लोकशिक्षण मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. झाडे तोडल्यामुळे अनेक ठिकाणी जमिनीची प्रचंड प्रमाणात धूप झाली. तसेच कोकणात, विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात जंगलतोडीमुळे पावसाने डोंगराची धूप होऊन तो गाळ नद्यांत साठला. अनेक ठिकाणी नद्यांना पूर येऊन बाजारपेठा उद्ध्वस्त झाल्या आहेत, शेतीचेही अतोनात नुकसान झाले. जंगलतोड थांबावयाची असेल तर लोकांना जळणासाठी लाकूड उपलब्ध करून दिले पाहिजे. या दृष्टीने ' सामाजिक वनीकरणा 'चे कार्यक्रम शासन, विविध सार्वजनिक संस्था व ग्रामस्थांचे गट हाती घेत आहेत हे स्वागतार्ह आहे. महाराष्ट्रातील एकूण वनक्षेत्र ६४,१६६ चौ० कि० मी० इतके आहे. वनस्पतीपासुन अंदाजे १०९ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल वनसंवर्धनाच्या बाबतीत अद्याप पुष्कळच काम करणे आवश्यक आहे.

वरील सर्व विवेचनावरून महाराष्ट्रातील शेतीची दुरवस्था समजून येईल असे वाटते. १९६० साली महाराष्ट्र निर्माण झाला, तेव्हा महाराष्ट्रभूमी सुजला होईल, आपण ती सुफला करून दाखवू असे येथील शेतकऱ्याला वाटत होते. परंतु सिंचन क्षमतेचा पूर्ण वापर न झाल्याने, विजेचा पुरवठा अपुरा झाल्याने, उपलब्ध पाण्याचेही वाटप विषम रीतीने होत असल्याने आणि दूरदृष्टीने येथील जमिनीचा पोत सुधारावा यासाठी योजना आखल्या न गेल्याने बहुसंख्य शेतकरी विकासाच्या प्रक्रियेपासून वंचितच राहिला आहे. गेल्या २५ वर्षांत संघटित कामगार, शासकीय कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षक, यांना अनेक सुविधा व सवलती व मिळाल्या. विकासातील प्रचंड भाग येथील भांडवलदार वर्गाने मुख्यत: लाटला आहे. सहकारी चळवळीने सुखवस्तू शेतकऱ्यांचे काही मर्यादित प्रदेश उत्पन्न झाले आहेत, परंतु जिराईत शेती करणारा महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी अद्याप आकाशाकडेच डोळे लावून आहे.....



The destruction of the forest is a cause for [illegible]ued droughts in